बुलढाणा । सोमवार
१ एप्रिल २०२४
■ वर्ष-१ ■ अंक-२२९
■ पृष्ठे-८ ■ किंमत-५ रु.
DAINIK MAHABHOOMI
dainikmahabhoomi@gmail.com

दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष

साधनाश्री
प्लॉटींग & कन्स्ट्रक्शनस्
बुलढाणा
बुलढाणा शहरात कुठेही प्लॉट/ घर / रो-हाऊस/ फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध.
गणेश जाधव
(कार्यकारी संचालक)
7385466666
ऑफिस पत्ता - श्री माऊली होमिओपॅथीक हॉस्पिटल (जुने) डॉ.लध्दड हॉस्पिटल जवळ, बुलढाणा

### राहुल गांधींचा मोदींवर हल्लाबोल..
# लोकसभेची मॅच सुरु होण्याआधीच 'फिक्सिंग'





**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

लोकसभा निवडणूक आपल्या समोर आहे. हा सामना सुरू होण्याआधीच फिक्स करण्याचा प्रयत्न सुरू झालाय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंच (अंपायर) नेमले आहेत. आमच्या टीममधील दोन खेळाडूंना अटक केली गेलीये. त्यांनी चारशे पारचा नारा दिलाय पण ईव्हीएमशिवाय भारतीय जनता पक्ष १८० पार देखील करू शकत नाही, असा हल्लाबोल करतानाच मॅच फिक्सिंग करून भाजपने निवडणूक जिंकली आणि संविधान बदलण्याच्या दृष्टीने पावलं टाकली तर देशात आग लागेल असा इशारा काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दिला.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्यधोरण घोटाळाप्रकरणी अटक केल्याच्या निषेधार्थ 'इंडियन नॅशनल डेव्हलपमेंट इनक्लूसिव्ह अलायन्स'तर्फे (इंडिया) रविवार, ३१ मार्च रोजी दिल्लीतील रामलीला मैदानात सभा संपन्न झाली.या सभेच्या निमित्ताने 'इंडिया'तील सारे पक्षनेते पुन्हा दिल्लीत जमले होते. 'हुकूमशहा हटवा, लोकशाही वाचवा' अशी इंडिया आघाडीची घोषणा होती. इंडियातील प्रमुख

### लोकशाही वाचवण्याची जबाबदारी आपली : पवार



*राष्ट्रवादी-एससीपी अध्यक्ष शरद पवार म्हणाले की, या सरकारने (केंद्र सरकारने) दिल्लीचे मुख्यमंत्री, झारखंडचे मुख्यमंत्री यांना अटक केली आहे आणि इतर अनेक राज्यांतील नेत्यांनाही तुरुंगात टाकले आहे. ही कारवाई म्हणजे लोकशाही आणि संविधानावर हल्ला आहे. ते (लोकशाही) वाचवण्याची जबाबदारी आपली आहे.*

### ..पण त्यांच्या विचारसरणीला अटक कशी करणार?



*पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान म्हणाले की, तुम्ही अरविंद केजरीवाल यांना अटक कराल, पण त्यांच्या विचारसरणीला अटक कशी करणार? जन्माला आलेल्या लाखो केजरीवालांना तुम्ही कसे थांबवाल? अरविंद केजरीवाल हे एक विचारसरणीचे नाव आहे. भारत आघाडी पूर्णपणे एकत्र आली आहे. सगळे एकत्र कसे बसले या विचाराने अनेकांचे कॅमेरेही थरथरू लागले असतील. आपण एकत्र यावे असे त्यांना वाटत नाही. म्हणूनच मी सर्वांना सांगू इच्छितो की एकत्र या. या भ्रष्ट लोकांनी कितीही पैसा, सोने, चांदी, दागिने गोळा केले तरी कफनाला खिसा नसतो हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे.*

### प्रियंका गांधीने मांडल्या ५ मागण्या



- *भारतीय निवडणूक आयोगाने निवडणुकीत सर्वांना समान संधी सुनिश्चित करावी.*
- *निवडणूक आयोगाने विरोधी पक्षांवरील ईडी, सीबीआय व इन्कम टॅक्सची कारवाई थांबवावी.*
- *हेमंत सोरेन आणि अरविंद केजरीवाल यांची तात्काळ सुटका करावी.*
- *विरोधी पक्षांना आर्थिकदृष्ट्या कमकुवत करण्याचे प्रयत्न थांबवले पाहिजेत.*
- *इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून भाजपला मिळालेल्या निधीची एसआयटी चौकशी व्हायला हवी.*

### भाजपची हुकूमशाही विचारधारा फुलू देणार नाही : चंपाई सोरेन



*झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन म्हणाले की, हेमंत सोरेन यांना ज्या जमिनीसाठी अटक करण्यात आली होती, त्याचा उल्लेख कोणत्याही पुस्तकात नाही. हेमंत सोरेन यांनी झारखंडमधील दलित आणि मागासवर्गीयांच्या उन्नतीचे काम सुरू केले तेव्हा भाजपच्या पोटात दुखले. आपल्या पूर्वजांनीही झारखंडमध्ये अशीच लढाई लढली होती. आज इथून संपूर्ण भारताला संदेश जाईल की आपण सर्व एक आहोत. भाजपची हुकूमशाही विचारधारा आम्ही फुलू देणार नाही.*

# माढा, सातारा, सोलापूरसह वंचितची ११ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर



**नागपूर, वृत्तसंस्था :**

लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीनं ११ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी मविआपासून दूर झाल्याचं स्पष्ट झालं आहे. पहिल्या यादीत पूर्व विदर्भातील मतदारसंघाचा समावेश होता तर दुसऱ्या यादीत वंचितनं मराठवाडा, मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही मतदारसंघातील उमेदवारांची घोषणा केली आहे.

प्रस्थापित आणि विस्थापित या दोघांच्या समन्वयातून पुढे जावे असा माझा प्रयत्न होता. परंतु प्रस्थापित नेत्यांकडून विरोध झाला. प्रस्थापितांनी काँग्रेस, भाजप,राष्ट्रवादी आणि शिवसेनाही ताब्यात घेतला. खासदार, आमदार असलेले परस्परांशी निगडित लोक आहेत. आमचे उमेदवार विस्थापित वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे आहेत. आमची कन्सेप्ट मान्य झाली नाही, त्यांची आपसातली भांडणे मिटली नाहीत. यामुळे महाविकास आघाडीत वंचित बहुजन आघाडीचा समावेश होऊ शकला नाही असे रोखठोक प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी नागपूरच्या पत्रकार परिषदेत केले मागील निवडणुकीत आमच्या ८ जागा या काँग्रेस-राष्ट्रवादीमुळे पडल्या, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

### असे आहेत उमेदवार..

- हिंगोली - डॉ. बी.डी चव्हाण
- लातूर - नरसिंहराव उदगीरकर
- सोलापूर - राहुल काशिनाथ गायकवाड
- माढा - रमेश बारस्कर
- सातारा - मारुती धोंडीराम जानकर
- धुळे - अब्दुल रहेमान
- हातकणंगले-दादासाहेब चवगौंडा पाटील
- रावेर-संजय ब्राम्हणे
- जालना - प्रभाकर बकले
- मुंबई उत्तर मध्य - अब्दुल हसन खान
- रत्नागिरी-सिंधुदुर्ग - काका जोशी

## थोडक्यात

### छगन भुजबळ पुन्हा अडचणीत?



**दिल्ली :** महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात पुन्हा एक घडामोड समोर आली आहे. आज म्हणजेच १ एप्रिल रोजी हाय कोर्टात या प्रकरणात सुनावणी होणार आहे. त्यामुळे निर्दो ष मुक्तता झालेले छगन भुजबळ यांच्या अडचणीत पुन्हा वाढ होणार की एसीबीच्या न्यायालयाने दिलेला निर्णय कायम राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांची महाराष्ट्र सदन घोटाळ्या प्रकरणात पुन्हा अडचण वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कारण भुजबळ यांची महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात निर्दोष मुक्तता होऊनही त्या निर्णयाविरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतलेली होती. गेल्या दीड वर्षांपासून या प्रकरणाच्या सुनावणीसाठी तारीख मिळत नव्हती. अखेर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी हस्तक्षेप करून या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले.

# लोकसभा निवडणूक : भाजपची नववी यादी जाहीर




**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने रविवारी ( दि. ३१ मार्च ) नववी यादी जाहीर केली. यामध्ये बहुचर्चित राजस्थानच्या भीलवाडा लोकसभा मतदारसंघातून दामोदर अग्रवाल यांना तिकीट देण्यात आले आहे. दरम्यान, भाजपने शनिवारी आपल्या उमेदवारांची आठवी यादी जाहीर केली होती. यामध्ये पंजाबमधील गुरुदासपूर लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार आणि अभिनेता सनी देओलचे तिकीट रद्द केले होते. त्यांच्या जागी दिनेश सिंग यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

५४३ सदस्यांच्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने आतापर्यंत ४१२ जागांसाठी आपले उमेदवार जाहीर केले आहेत. लोकसभेच्या ५४३ जागांसाठी १९ एप्रिल ते १ जून दरम्यान सात टप्प्यांत निवडणुका होणार आहेत. ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. भाजपच्या पहिल्या यादीत १९५ नावे जाहीर करण्यात आली होती. त्यात ३४ केंद्रीय आणि राज्यमंत्र्यांची नावे आहेत. पहिल्या यादीत २८ महिलांनाही संधी देण्यात आली आहे. दुसऱ्या यादीत ७२ नावांचा समावेश होता. ७२ उमेदवारांच्या दुसऱ्या यादीत नागपूरमधून नितीन गडकरी आणि हमीरपूरमधून अनुराग ठाकूर यांना तिकीट देण्यात आले होते.

# 'सीयूईटी यूजी' परीक्षेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**नवी दिल्ली :** नॅशनल टेस्टिंग एजन्सीने परिक्षार्थींच्या विनंतीनंतर अंडरग्रेज्युएट अभ्यासक्रमांसाठी सामायिक विद्यापीठ प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख वाढवली आहे. नवीन वेळापत्रकानुसार, परिक्षार्थी आता २०२४ प्रवेश परीक्षेसाठी अधिकृत वेबसाइटला ४ एप्रिल, सायंकाळी ९:५० वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज करू शकतात. अर्जाची मुदत वाढवण्याची ही दुसरी वेळ आहे. या अर्जाची मुदत २६ मार्च रोजी संपणार होती, मात्र त्यामध्ये बदल करत २६ मार्च ते ३१ मार्चपर्यंत वाढविण्यात आली. रविवारी पुन्हा ही तारीख वाढवून ५ एप्रिल करण्यात आली.

# धार्मिक भावना भडकाविल्याप्रकरणी धीरेंद्र शास्त्री महाराजांविरोधात गुन्हा

**भंडारा, वृत्तसंस्था :**



मानव धर्माचे संस्थापक बाबा जुमदेव आणि त्यांच्या सेवकांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणारे बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री महाराज यांच्यावर अखेर मोहाडी पोलिस ठाण्यात धार्मिक भावना भडकविल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

भंडारा जिल्ह्यातील मोहाडी येथे धीरेंद्र शास्त्री महाराजांचे प्रवचन सुरू आहे. या कार्यक्रमात धीरेंद्र शास्त्री महाराजांनी बाबा जुमदेव तसेच त्यांच्या सेवकाबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. त्यानंतर मानव धर्म सेवकांमध्ये प्रचंड असंतोष उसळला. रविवारी हजारोंच्या संख्येने सेवक मोहाडी येथे दाखल झाले. धीरेंद्र शास्त्री महाराजांनी माफी मागावी व त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवावा, अशी मागणी सेवकांची होती.

यावेळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जिल्हा पोलिस अधीक्षक लोहित मतानी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे यांनी मोहाडी पोलिस ठाण्यात धाव घेतली. सेवकांसोबत झालेल्या चर्चेनंतर मागण्या मान्य केल्याचे आश्वासन दिल्यानंतर हा तणाव निवळला. अखेरीस दुपारनंतर धीरेंद्र शास्त्री महाराजांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दरम्यान, संध्याकाळी ६ च्या सुमारास अनेक सेवकांनी मोहाडी पोलिस ठाण्यासमोर गर्दी केली होती. त्यांना पांगविण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. यात काही सेवक जखमी झाल्याची माहिती आहे.

# देशात एका पक्षाचे सरकार धोकादायक : ठाकरे

**दिली, वृत्तसंस्था :**



देशातील एका व्यक्तीचे आणि एक पक्षाचे सरकार घालविण्याचे वेळ आली आहे. एका पक्षाचे सरकार देशासाठी घातक ठरू लागले आहे. देशाची तानाशाहीकडे वाटचाल सुरू झाली आहे, असा घणाघात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाजपवर केला. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधार्थ दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडीच्या वतीने रविवारी (दि. ३१) महारॅली आयोजित केली होती. यावेळी ते बोलत होते.

माझा परिवार असे म्हणून काहीही होत नाही. तर कुटुंबाची जबाबदारीही घेण्याची गरज आहे. निवडणूक रोख्यांचे बिंग फुटल्यानेच अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आल्याचा आरोपही ठाकरे यांनी यावेळी केला. भाजप या रॅलीला गुंडांची रॅली म्हणत आहे. परंतु आम्ही निवडणूक प्रचारासाठी नाही, तर लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी एकत्र आलो आहोत. भाजपने ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते, त्यांना वॉशिंग मशीनमध्ये धुवून स्वच्छ केले. भ्रष्टाचाऱ्यांनी भरलेला पक्ष सरकार कसे चालवू शकतो? ज्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत, ते सर्व भाजपसोबत आहेत. ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स यांचा वापर भाजप विरोधकांना संपविण्यासाठी केला.

# काँग्रेस-माकपची भाजपशी हातमिळवणी : ममता बॅनर्जी

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

प.बंगालमध्ये माकप आणि काँग्रेस भाजपसाठी काम करतातय. या दोन्ही पक्षांनी भाजपशी हातमिळवणी केली आहे, असा गंभीर आरोप करत लोकसभा निवडणुकीत भाजपने २०० पेक्षा अधिक जागा जिंकून दाखवा, असे आव्हान तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी रविवारी दिले.

यावेळी ममता बॅनर्जी म्हणाल्या की, लोकसभा निवडणूक प्रचारात भाजप ४०० पार असा नारा देत आहे. मी त्यांना आव्हान देते की, त्यांनी आधी २०० जागा जिंकून दाखवाव्यात. प.बंगालमध्ये २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने २०० हून अधिक जागा जिंकणार असल्याची वल्गना केली होती; परंतु त्यांना केवळ ७७ जागांवरच समाधान मानावे लागले.

# हर्षवर्धन जाधव पुन्हा एकदा निवडणूक रिंगणात

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

### पत्रकार परिषद घेत व्यक्त केली इच्छा



छत्रपती संभाजीनगर लोकसभेच्या राजकारणात आज ३१ मार्च रोजी नवा ट्विस्ट आला आहे. कारण, कन्नडचे माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी पत्रकार परिषद घेत निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे. एवढेच नव्हे तर 'वंचित' ने संधी दिली तर वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचेही हर्षवर्धन जाधव यांनी घोषित केले आहे.

छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीकडून माजी खासदार चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर अद्याप महायुतीचा उमेदवार जाहीर झाला नाही. महायुतीमध्ये छत्रपती संभाजीनगरची सीट कोणाला सुटते हे पहावे लागणार आहे. अशातच २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत बहुतांश मते घेणारे कन्नडचे माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी आज पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे ठाकरे गटातील अंबादास दानवे आणि चंद्रकांत खैरे यांची दिलजमाई आजच झाली असताना त्याच दिवशी माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी लोकसभेसाठी दंड थोपटल्याने नेमकी ही टाईमिंग अनेकांच्या भुवया उंचवणारी आहे हे विशेष.

### पावणे तीन लाख मतं मिळविणारे जाधव पुन्हा रिंगणात

*छत्रपती संभाजीनगरमध्ये २०१९ मध्ये त्रिशंकू लढत झाली होती. यामध्ये चंद्रकांत खैरे यांना ३ लाख ८३ हजार १८६ मतं मिळाली होती. तर विजयी उमेदवार इम्तियाज जलील यांना ३ लाख ८८ हजार ३७३ एवढी मतं मिळाली होती. यामध्ये माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी तब्बल २ लाख ८२ हजार ५४७ एवढी मत आपल्या पारड्यात पाडून घेतली होती.*

### कराड, पाटीलही इच्छुक

*छत्रपती संभाजीनगरचे विद्यमान खासदार इम्तियाज जलील यांना एमआयएमकडून पुन्हा एकदा निवडणुकीच्या मैदानात उतरविले आहे. ठाकरे गटाने चंद्रकांत खैरेंना उमेदवारी देणार आली आहे. यासोबतच शिंदे गटाकडून विनोद पाटील यांचे नाव चर्चेत असून, भाजपकडून भागवत कराड यांचेही नाव चर्चेत आहे. असे असतानाच आता माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. तेव्हा ही निवडणूक पुन्हा एकदा रंगतदार होणार आहे.*

# लालकृष्ण अडवाणींना भारतरत्न पुरस्कार प्रदान

**दिल्ली, वृत्तसंस्था :**



देशाचे माजी उपपंतप्रधान, भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना रविवारी (दि.३१) भारतरत्न प्रदान करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यानंतर पीएम मोदी यांनी अडवाणींसोबतचा अनुभव शेअर करत त्यांच्याबद्दल गौरद्गार काढले आहेत, या संदर्भातील एक्स पोस्ट त्यांनी त्यांच्या अकाऊंटवरून केली आहे.

पीएम मोदी यांनी म्हटले आहे की, 'लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न बहाल करताना पाहणे खूप खास होते. हा सन्मान म्हणजे आपल्या देशाच्या प्रगतीत त्यांच्या अतुलनीय योगदानाची ओळख आहे. लोकसेवेसाठीचे त्यांचे समर्पण आणि आधुनिक भारताला आकार देण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका यांनी आपल्या इतिहासावर छाप उमटवली आहे. गेल्या अनेक दशकांमध्ये त्यांच्यासोबत खूप जवळून काम करण्याची संधी मिळाली याचा मला अभिमान आहे.

प्रकृती अस्वास्थ्यामुळे अडवाणी शनिवारी राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभाला उपस्थित राहू शकले नव्हते. त्यामुळे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अडवाणींच्या घरी जाऊन त्यांना देशातील सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक नेते उपस्थित होते.

## थोडक्यात

### पोलीस अंमलदारावर गुन्हा दाखल



**छत्रपती संभाजीनगर :** छावणी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका अंमलदाराने महिलेचं लैंगिक शोषण करून दोन लाख रुपये उकळले. याप्रकरणी छावणी पोलीस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अंमलदार विशाल सुखदेव दांडगे हा २०१८ मध्ये वेदांतनगर पोलीस ठाण्यात कार्यरत होता. या काळात त्याची ओळख एका महिलेशी झाली होती. या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. त्यानंतर २०१८ ते २९ मार्च २०२४ या कालावधीत विशाल दांडगे याने लग्नाचे आमिष दाखवून लक्ष्मी कॉलनी छावणी व मिल कॉर्नर येथील शासकीय निवास्थान व हॉटेल पंजाब येथे महिलेवर अत्याचार केले. त्याचबरोबर पीडित महिलेकडून दोन लाख रुपये उकळले. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोलिसांसह निवडणूक आयोग अलर्ट मोडवर..

# मराठवाड्यात १२२ मतदान केंद्रे अद्यापही अतिसंवेदनशील

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, राष्ट्रीयसह प्रादेशिक पक्षांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. अशातच काही पक्षांनी प्रचाराचे रणशिंगसुद्धा फुंकले आहे. याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगही अलर्ट मोडवर आला असून, निवडणूक आयोगाने राज्यातील अतिसंवेदनशील मतदान केंद्रे घोषित केली आहेत. यामध्ये मराठवाड्यातील आठ लोकसभा मतदारसंघामध्ये तब्बल १२२ केंद्रे अतिसंवेदनशील असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

चळवळीचा विभाग असलेला मराठवाडा विभागात लोकसभेचे एकूण आठ मतदारसंघ आहेत. २०१९ च्या निवडणुकीत भाजपाला सर्वाधिक जागा जिंकता आल्या होत्या. असे असतानाच यंदाही २०२४ च्या लोकसभा निडणुकीत भाजपासह महायुतीतील प्रादेशिक पक्षांनी निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. तर महायुतीला टक्कर देण्यासाठी महाविकास आघाडीही सज्ज झाली आहे.

मात्र, या आघाडी आणि महायुतीच्या लढाईत सर्वसामान्य मतदार पिचल्या जाऊ नये म्हणून निवडणूक आयोगानेही त्यांची तयारी सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील आठ लोकसभा मतदारसंघात किती मतदान केंद्र अतिसंवेदनशील आहेत याची यादी जाहीर करण्यात आली असून, या मतदान केंद्रावर निवडणुकी दरम्यान मतदानाच्या दिवशी तगडा पोलीस बंदोबस्त असणार आहे एवढे मात्र निश्चित.

**ही आहे मराठवाड्यातील अतिसंवेदनशील मतदान केंद्रे**

| जिल्हा | अतिसंवेदनशील मतदान केंद्रे |
|---|---|
| छ.संभाजीनगर | १६ |
| परभणी | ४२ |
| नांदेड | ३१ |
| बीड | १६ |
| धाराशीव | ०६ |
| जालना | ०५ |
| लातूर | ०५ |
| हिंगोली | ०१ |
| एकूण | १२२ |



### असे होणार मतदारसंघनिहाय मतदान

*मराठवाड्यातील आठ लोकसभा मतदारसंघात टप्प्या- टप्प्याने मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये हिंगोली, नांदेड आणि परभणीत २६ एप्रिल २०२४ तर धाराशिव आणि लातूरमध्ये ७ मे २०२४ रोजी तर जालना, छत्रपती संभाजीनगर आणि बीडमध्ये १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. याचा निकाल ४ जून रोजी जाहीर केल्या जाणार आहे.*

### प्रशासन सतर्क

*आचारसंहितेच्या काळात पोलीस, राज्य उत्पादन शुल्क, आयकर विभाग, अंमली पदार्थ विरोधी विभाग सक्रीय असून, ठिकठिकाणी तपासणी केली जात आहे. एकूण प्रशासन सध्या अलर्ट मोडवर आल्याची आहे.*

## छत्रपती संभाजीनगर ते मुंबई, हैदराबाद हवाई प्रवासाला गती

**छ.संभाजीनगर :** मराठवाड्यातील एकमेव विमानतळ असलेल्या संभाजीनगरहून मुंबई आणि हैदराबादला एक अधिक विमान तर अहमदाबादला नव्याने विमान अशी थेट विमानसेवा सुरू करण्यात आली आहे. यामुळे छत्रपती संभाजीनगरहून राष्ट्रीय स्तरावरील हवाई प्रवासाला गती मिळाल्याची समाधानकारक स्थिती आहे.

इंडिगो कंपनीतर्फे या हवाई प्रवासाची सुरुवात आज ३१ मार्च रोजी पासून करण्यात आली आहे. ३१ मार्चपासून सुरू करण्यात आलेल्या या विमान सेवेचा विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लाभ होणार आहे. आजपासून छत्रपती संभाजीनगर शहरातून मुंबई, हैदराबाद, अहमदाबाद, दिल्ली आणि बंगळुरू अशा पाच शहरांशी थेट एअर कनेक्टिव्हिटी सुरू होणार आहे. तसेच एका दिवसात मुंबईत सकाळी जाऊन रात्री परतणे शक्य होणार आहे. यामुळे छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील व्यापारी, उद्योजकांना मोठा दिलासा मिळाला आहे.




## अंबादास दानवे थेट खैरेंच्या भेटीला!

### पेढा भरवताच मिटला वाद



छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

ठाकरे गटाने लोकसभा निवडणुकीची पहिली यादी जाहीर केल्यानंतर चंद्रकांत खैरे यांना छत्रपती संभाजीनगरमधून उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे अंबादास दानवे नाराज असल्याची चर्चा रंगली होती. मात्र, आज छत्रपती संभाजीनगरमध्ये गेल्या काही दिवसांपासून ठाकरे गटात सुरू असलेली धुसफूस संपली आहे. अंबादास दानवे यांनी आज ३१ मार्च रोजी चंद्रकांत खैरे यांची भेट घेत त्यांना पेढा भरवून दोघांच्या वादाला पूर्ण विराम दिला आहे.

औद्योगिक राजधानी असलेले छत्रपती संभाजीनगर जिल्हा राजकारणाच्या दृष्टीने राज्याचे केंद्रबिंदू आहे. याच छत्रपती संभाजीनगर शहरातील ठाकरे गटातील दोन नेत्यांमधील वाद सर्वश्रुत आहे. ते दोन नेते म्हणजे माजी खासदार चंद्रकांत खैरे आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे. ठाकरे गटाकडून चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर अंबादास दानवे यांनी त्यांची नाराजी बोलून दाखविली होती.

मात्र, आज रविवारी अंबादास दानवे यांनी चंद्रकांत खैरेंची भेट घेत त्यांना आगामी लोकसभा निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी दानवेंनी खैरे यांना शाल आणि बुके भेट देऊन पेढाही भरवला. त्यामुळे किमान लोकसभा निवडणुकीत या दोन्ही नेत्यांमधील वाद संपला असल्याचं पाहायला मिळत आहे.

### वेरुळ येथील नाथाश्रमात नवनाथ कथेचे आयोजन


**छत्रपती संभाजीनगर :** वेरुळ येथील नाथाश्रमात सदगुरू अक्काताई महाराज यांच्या आशीर्वादाने आणि प्रमुख उपस्थितीत संगीतमय नवनाथ कथेचे आयोजन करण्यात असून, ही कथा सोमवार १ एप्रिल ते सोमवार ८ एप्रिलपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. या संगीतमय नवनाथ कथेसाठी प्रसिद्ध कथा प्रवक्ते स्वामी अरुणागिरीजी महाराज यांच्या वाणीतून होणार असून, यावेळी कथालेखक निळकंठ तरकासे बाबूजी, संगीतकार कैलास महाराज, लखनगिरी महाराज, दीपक महाराज लोंढे, सोमनाथ महाराज तळेकर, प्रेमनाथ महाराज पवार आणि धर्मनाथ महाराज यांचीही उपस्थिती राहणार आहे.

## मार्च एंडींगमध्ये आरटीओ कार्यालयाची ५५० कोटींची कमाई

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

राज्य शासनाची सध्या मार्च एंण्डमुळे जोरदार वसूली केली जात आहे. त्यामुळेच वसुली करणार्या प्रत्येक शासकीय कार्यालयांची विविध करांच्या वसुलीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरु आहेत. छत्रपती संभाजीनगरने ३०० कोटीपेक्षा अधिक वसूली झाली आहे. बीड व जालना दोन्ही शहरेही अनुक्रमे ७०, ८५ कोटीच्या पुढे गेले आहेत. तीन्ही जिल्हे मिळून ५५० कोटीची वसूली पूर्ण करण्यासाठी आरटीओ कार्यालय कामाला लागली आहे.

शासनाला मोठ्या प्रमाणा महसूल मिळवून देणार्या आरटीओ कार्यालयाने परिवहन विभागाने यंदाच्या वर्षात छत्रपती संभाजीनगरला तब्बल ३६१.१५ कोटी रुपयांच्या वसूलीचे टार्गेट दिलेले आहे. फेब्रुवारीपर्यंत ही वसूली तीनशे कोटीच्या पुढे गेली आहे. बीड शहराला ८६.९९ कोटीचे टार्गेट असून बीडने ७० कोटीच्या पुढे वसूली केली आहे. तर जालना शहराला ९९.८५ कोटी वसूलीचे लक्ष दिले होते, जालना आरटीओने ८५ कोटी पेक्षा अधिक वसूली केली आहे.




## मजुराचा इमारतीवरुन पडून मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** एमजीएम कॅम्पसमधील जेएनएसी अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळील एका चार मजील इमारतीला रंग देण्यासाठी गेलेल्या मजुराचा सेफ्टी बेल्ट निसून मृत्यू झाल्याची घटना ३० मार्च रोजी घडली. मो.कदीर मो.जफर (१९, रा.बिहार) असे मृत कामगाराचे नाव आहे. मोहम्मद कदीर हा सहा महिन्यांपासून शहरात मित्रांसोबत कामाला आला होता. एमजीएमच्या एका इमारतीच्या चौथ्या मजल्याला बाहेरील बाजूने मोहम्मद कदीर हा सेफ्टी बेल्टच्या सहाय्याने लटकून रंग मारत होता. अचानक सेफ्टी बेल्टचे हुक निखळल्याने तो खाली पडून जबर जखमी झाला. घाटीत दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषीत केले.

## वाढत्या उकाड्यामुळे पर्यटकांची संख्या रोडावली

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

### पवनचक्की, बीबी का मकबरा असतो दुपारी सामसूम

मराठवाड्यासह राज्याची पर्यटन राजधानी म्हणून ओळख असलेल्या छत्रपती संभाजीनगर शहरात पवनचक्कीसह ऐतिहासिक असा बीबी का मकबरा ही पर्यटनस्थळे आहेत. मात्र, मागील काही दिवसांपासून शहर आणि परिसरात वाढत्या उन्हाच्या उकाड्यामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळेस घराबाहेर पडणे टाळल्याचे चित्र आहे. त्यामुळे पवनचक्कीसह बीबी का मकबरा या पर्यटनस्थळी दुपारच्या वेळी शुकशुकाट दिसून येत आहे.

ऐतिहासिक राजधानी असलेल्या छत्रपती संभाजीनगरात यंदाच्या उन्हाळ्यात कमाल तापमान चक्क ३९.५ अंशसेल्सीअसवर पोहोचल्याची नोंद झाली आहे.



यापूर्वी २६ मे २०२३ रोजी ३९.५ अंश सेल्सीअस तापमान नोंदविले होते. शनिवारी काहीकाळ ढगाळ वातावरण होते. मात्र, आज पुन्हा सकाळपासूनच उन्हाच्या तीव्र झळा नागरिकांच्या जीवाची लाही लाही करत असल्याचे चित्र आहे. छत्रपती संभाजी नगर शहरात रात्रीचे तापमान २४. ४ म्हणजे सरासरीच्या तुलनेत ३.४ अंशाने घटल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे उकाळ्याने शहरवासीय हैराण झाले आहेत.

**बीबी का मकबरा पाहणाऱ्यांची संख्या घटली**

*उन्हामुळे बीबी का मकबरा पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत सुमारे एक हजाराने घट झाली आहे. पर्यटक सकाळी आणि सायंकाळी येत आहेत. दुपारी उन्हामुळे मकबरा परिसरात सामसूम असते. फेब्रुवारीमध्ये रोज सरासरी ३ हजार पर्यटक बीबी का मकबरा पाहण्यासाठी येत होते. अशी माहिती तेथील प्रशासकाने दिली आहे. ती संख्या आता फक्त दोन हजारापर्यंत येऊन पोहोचली आहे. तेव्हा बीबी का मकबरा पाहणाऱ्यांना उन्हाच्या झळा सोसाव्या लागत असल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे.*




### राशीभविष्य

- **मेष** : सारासारबुद्धी वापरा. तरुणांना जबाबदारीची समज द्या. विनाकारण अडचणीत गुंताल.
- **वृषभ** : कौटुंबिक गैरसमज दूर होतील. संततीच्या अपेक्षा पूर्ण कराल. अचानक अर्थप्राप्तीचे योग.
- **मिथुन** : नोकरीत सहकारी अडथळे निर्माण होतील. प्रिय व्यक्ती नाराज होईल. प्रवासात धोका.
- **कर्क** : घरात शुभकार्य होईल. ताणतणाव संपतील. करमणुकीत वेळ घालवाल.
- **सिंह** : मनावर ताबा ठेवणे कठीण होईल. कोणा एकाच्या हट्टीपणाचा त्रास होईल. आळस नुकसान करेल.
- **कन्या** : पैशाची आवक उत्तम राहील. कुटुंबाकडून उत्तम सहकार्य मिळेल. संततीबद्दल सुवार्ता कळतील.
- **तूळ** : शरीरावर अतिश्रमाचा परिणाम होईल. कोणास सल्ला देत बसू नका. खाण्यावर नियंत्रण ठेवा.
- **वृश्चिक** : मालमत्तेचा वाद मिटेल. जुनी येणी वसूल होतील. कार्यक्षेत्रात आवडीचा प्रोजेक्ट मिळेल.
- **धनु** : नातेवाईकांमुळे अडचणी निर्माण होतील. जुनी दुखणी त्रास देतील. खर्चात अनपेक्षित वाढ होईल.
- **मकर** : आर्थिक स्थिती बिकट राहील. प्रवास म्हणजे समस्या वाटेल. विवेकबुद्धी जागृत ठेवा.
- **कुंभ** : गोड बोलून कार्यभाग साधाल. सर्व बाबतीत आघाडी असेल. संकल्प सिद्धीस जातील.
- **मीन** : शासकीय कामास अनुकूल दिवस. आत्मविश्वास जागृत राहील. नवपरिणीतांचे प्रश्न सुटतील.


### दिनविशेष

**१ एप्रिल**

- **२०१३** : वादग्रस्त सेतुसमुद्रम प्रकल्पासंदर्भात भूमिका मांडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडूला दोन आठवड्यांचा वेळ दिला.
- **२०१६** : अभिनेत्री प्रत्युषा बॅनर्जीची आत्महत्या.
- **२०१७** : सक्तवसुली संचालनालयाच्या पथकांनी देशभरातील २३०० बनावट कंपन्यांवर छापे टाकले.
- **२०१८** : इस्त्रोच्या 'जीसॅट-६ ए' या दळणवळण उपग्रहाशी नियंत्रण कक्षाचा संपर्क तुटला. संशोधकांमध्ये चिंतेचं वातावरण.

### जपा आरोग्य — महत्त्वपूर्ण मूत्रपिंड

आपल्या शरीरातील प्रत्येक अवयव महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असला तरी त्यातील काही अवयवांचे कार्य विशेष महत्त्वाचे असते. त्यात काही गुंतागुंत वा विस्कळीतपणा आल्यास अतिशय परिणाम बघायला मिळतात. शरीरात सातत्याने सुरू असणाऱ्या अनेक जीवरासायनिक क्रियांदरम्यान काही टाकाऊ पदार्थ तयार होत असतात. ते साचून राहणं घातक ठरतं. त्यामुळे त्यांचा नियमित निचरा होण्याची गरज असते. खेरीज आपण अबरचबर खात असल्यास शरीरात काही घातक उच्छिष्ट उरतात. त्यांचाही निचरा होणंही आवश्यक असतं. यापैकी टाकाऊ पदार्थ रक्तात उतरतात आणि ते काढून रक्त शुद्ध करण्याची जबाबदारी मूत्रपिंडावर असते. रक्त गाळून त्यातले टाकाऊ पदार्थ विरघळवून शरीराबाहेर टाकण्याचं कामही मूत्रपिंडाद्वारे होतं. शिवाय शरीरातील पाण्याच्या प्रमाणाचा समतोल राखण्याचं कामही मूत्रपिंडांना करावं लागतं. उन्हाळ्यात भरपूर घाम येतो. त्यामुळे शरीरातल्या पाण्याचा निचरा होतो. त्यामुळे मूत्राद्वारे अतिरिक्त पाणी बाहेर टाकण्याची आवश्यकता नसते. हिवाळ्यात याविरुद्ध परिस्थिती असते. त्या काळात घाम येत नाही. सहाजिकच अतिरिक्त पाण्याचा निचरा मूत्रातून करणं आवश्यक असतं. थंडीत वरचेवर लघवी लागते याचं कारण हेच आहे. अशाप्रकारे शरीरयंत्रणा सुरू ठेवण्यासाठी मूत्रपिंडाची महत्त्वाची भूमिका असते. त्यात बिघाड झाल्यास मोठी किंमत मोजावी लागते.



### सल्ला मोलाचा — सौंदर्यवर्धनाचा रसदार मार्ग

आता बाजारात आंब्याची आवक वाढली आहे. खरे तर उन्हाळा म्हणजे आंबा खाण्याचेच दिवस! आपण वर्षभर विविध फळांचा आस्वाद घेत असलो तरी वर्षभर वाट पाहिली जाणारे फळ म्हणजे आंबा...फळांचा हा राजा चवीला मधुर, रसदार, मिठास आहे तितकाच तो त्वचेच्या विविध समस्या दूर करण्यासाठीही उपयुक्त आहे. त्यामुळेच सौंदर्यसाधनेच्या दृष्टीनेही आंब्याचा विचार करायला हवा. या उष्ण दिवसात अनेकांना पिंपल्स येतात. कितीही उपाय केले तरी हा त्रास कमी होत नाही. अशावेळी या दिवसांमध्ये दोन चमचे आंब्याचा रस, थोडं गुलाबपाणी आणि चमचाभर मुलतानी माती घेऊन फेसपॅक तयार करा. तो चेहऱ्यावर लावून १५ ते २० मिनिटांनी धुवून टाका. हा उपाय सलग काही दिवस केल्यास नक्कीच चांगला फरक दिसून येईल. उन्हामुळे त्वचा टॅन झाली असेल तर एक चमचा आंब्याचा रस, दोन चमचे बेसन, दोन चमचे बदामाची पूड आणि एक चमचा मध हे साहित्य एकत्र करुन मास्क तयार करा आणि चेहऱ्याला लावा. यानेही त्वचा उजळेल.

### महत्त्वपूर्ण काही... — आहेत अनेक पर्याय

बारावीत 'पीसीएम' मध्ये चांगले गुण मिळाल्यानंतर सर्वसाधारणपणे विद्यार्थी इंजिनिअरींगकडे वळतात. पण मुलानी इंजिनिअरींगशिवायही काही पर्याय जाणून घ्यायला हवं. उदाहरणार्थ, सध्या वेगवेगळ्या शैलीच्या इमारती बांधल्या जात आहेत. तुम्ही कल्पक असाल तर आर्किटेक्चरमध्ये करीअर करू शकता. या क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत. आपल्या आसपासचा प्रत्येक घटक भौतिकशास्त्राशी संबंधित आहे. त्यामुळे या क्षेत्रात करीअरच्या नानाविध संधी उपलब्ध आहेत. कल्पकता, समस्या सोडवण्याची क्षमता अशा गुणवैशिष्ट्ये असतील तर तुम्ही फिजिक्समध्ये उच्चशिक्षण घेऊन कारकिर्द घडवू शकता. केमिस्ट्रीमध्ये पदवी मिळवून तुम्ही विविध क्षेत्रात काम करू शकता. फार्मसी, पेट्रोलियम, शैक्षणिक आदी क्षेत्रांमध्ये तुम्हाला काम करता येईल. तुमचं गणित चांगलं असेल तर बरंच काही करू शकता कारण विविध क्षेत्रांमध्ये गणिताचा वापर होत असतो. बँकिंग, इन्शुरन्स, विज्ञान, गुंतवणूक, आरोग्य आदी क्षेत्रांमध्ये स्टॅटिस्टिक्सचा वापर केला जातो. त्यामुळे हा पर्यायही समोर ठेवा.

### पंचांग

**सोमवार, १ एप्रिल २०२४**
शोभननाम संवत्सर, शके १९४५,
फाल्गुन कृ. ७, नक्षत्र : मूळ,
चंद्रराशी : धनु, वरियान योग
सूर्योदय ६.३५, सूर्यास्त : १८.५१

### फॉरवर्डस

**जीवलगाशी अद्वैत साधलं जातं तेव्हाची अवस्था अशी असते...**

मैने खुद को
मैं कहना छोड दिया
जब से उसने कहा
तुम मेरे हो...

### टेक्नो टॉक

फोनचं फॉर्मेटिंग हा एक महत्त्वाचा प्रश्न असतो. नवा फोन खरेदी केल्यानंतर जुन्या अँड्रॉईड फोनमधला डाटा फॉर्मेटिंग करून कायमचा डिलिट करता येतो. अँड्रॉईड स्मार्टफोनचं फॉर्मेटिंग अगदी झटपट होतं. कोणताही अँड्रॉईड फोन फॉर्मेट किंवा रिसेट करण्यासाठी सेटिंग्जमध्ये जा. इथे रिसेट किंवा इरेज हे पर्याय दिसतील. अर्थात फोनचं फॉर्मेटिंग करण्याआधी काळजी घेणं आवश्यक आहे. तुमच्या फोनमधल्या सगळ्या डाटाचं ऑनलाईन तसंच ऑफलाईन बॅकअप घेतलं आहे ना, याची खात्री पटल्यानंतरच फोन फॉर्मेट करा. फॉर्मेटिंगनंतर फोन अगदी नव्यासारखा होतो.

### महिलायन — साडी निवडा खुबीने

उन्हाळ्यात घामाच्या धारा लागत असल्यामुळे पारंपरिक पेहराव टाळले जातात. त्यातही साडी नेसायची म्हटली की, खूप वैताग येतो. या दिवसातल्या लग्न समारंभांमध्ये अनेकींना भरजरी साडी नेसण्याचा ताण येतो. मात्र निवड योग्य असेल तर उन्हाळ्यात साडी नेसणेही सुसह्य ठरू शकते. अशा वेळी साडी नेसताना नेमकं काय करता येईल याविषयी...

✻ आपल्या त्वचेला साजेशा रंगाची साडी निवडा. दुसरं म्हणजे साडीचा योग्य प्रकार निवडणं गरजेचं आहे. लिनन, कॉटन, सिल्क अशा मटेरियलच्या साड्या उन्हाळ्यात चांगल्या दिसतात. त्या शरीराच्या तापमानाशी जुळवून घेत असल्याने नेसल्यावर त्रास होत नाही.

✻ साडीवर गरजेपुरतेच दागिने घाला. हातात दोन बांगड्या, छोटेसे नेकलेस आणि छानसे कानातले एवढे मोजके दागिने घातले तर तुम्ही साडीतही सहज वावरू शकाल.

✻ उन्हाळ्यात केस मोकळे सोडणं वैतागवाणं ठरतं. हेअरस्टाईल करायचीच असेल तर ती अगदी साधी, सोपी असावी. पोनीटेलमध्ये बरं वाटेल. एथनिक लूकसाठी छानसा गजरा माळा किंवा फूल घाला.

✻ चेहऱ्यावर मेक अपचे थर थापू नका. गरजेपुरताच मेक अप करा. सौम्य मेक अपमध्ये तुम्ही छान दिसाल. हा मेक अप उन्हामुळे खराबही होणार नाही.

### खेचाखेची

**बघत राहतात...**

मी आमच्या ह्यांना नेहमीच विचारत असते की तुमच्या आयुष्यातली सगळ्यात मोठी समस्या कोणती? मला ती जाणून घ्यावीशी वाटते आणि जमलं तर त्यावर उपायही शोधावासा वाटतो. आवाक्यात असेल ती मदत मी त्यांना देऊ इच्छिते. पण ते कधीच काही बोलत नाहीत.

.

.


... नुसते निर्विकारपणे माझ्याकडे बघत राहतात.

### ओळख जगाची

स्लोव्हाकिया हा मध्य युरोपमधला छोटासा देश आहे. ७५ वर्षं या भूभागावर सोव्हिएत युनियन म्हणजे सध्याच्या रशियाचं राज्य होतं. १९९० मध्ये हा भाग सोव्हियत युनियनपासून वेगळा झाला आणि १९९३ मध्ये तो झेक रिपब्लिकपासून वेगळा होऊन स्वतंत्र झाला. ब्रातिस्लाव्हा ही या देशाची राजधानी आहे. या देशातले लोक स्लोव्हाक भाषा बोलतात. झेक रिपब्लिक, पोलंड, युक्रेन, हंगेरी आणि ऑस्ट्रिया हे या देशाचे शेजारी आहेत. स्लोव्हाकिया चारही बाजूंनी जमिनीने वेढलेला आहे. हा खूप छोटा देश आहे. स्लोव्हाकियाचा बराचसा भूभाग डोंगराळ आहे. देशाच्या उत्तरेला कारपाथियन पर्वतरांगा आहेत. या देशात नैसर्गिक साधनसंपत्ती भरपूर प्रमाणात आहे.

### स्मार्ट टिप्स — समस्या अनेक, उपाय एक

उन्हाचा कहार वाढत असून आगामी काळात त्याची तीव्रता अधिकच जाणवणार आहे. या उष्ण दिवसांमध्ये घामाच्या चिकचिकाटाने असह्य त्रास सहन करावा लागतो. घामाची दुर्गंधी नकोशी वाटते. म्हणूनच त्याचा बंदोबस्त करण्यासाठी उपाय योजायला हवे. याकामी टाल्कम पावडर उपयुक्त ठरु शकते. याखेरीज अन्य कामांसाठीही ती उपयुक्त ठरते. ✻ केस तेलकट असतील तर चांगला शॅम्पू यावरील उपाय ठरु शकतो. मात्र केस अति तेलकट असतील तर अतिरिक्त तेल शोषून घेण्यासाठी केसांच्या मुळांपाशी टाल्कम पावडर भुरभुरा आणि हलक्या हाताने स्क्रब करा. ✻ मस्कारा लावण्यापूर्वी पापण्यांवर टाल्कम पावडर भुरभरावी. यामुळे मस्कारा एकसारखा पसरतो. ✻ लिपस्टिक सेट करण्यासाठी आणि लाँग लास्टिंग इफेक्ट मिळवण्यासाठी टाल्कम पावडरचा उपयोग होतो. लिपस्टिक लावून झाल्यानंतर टिश्यू पेपरवर थोडी पावडर घ्या आणि हा पेपर ओठांवर दाबून धरा. आता परत लिपस्टिकचा हलका कोट द्या. यामुळे लिप कलर अधिक काळ टिकतो. ✻ वॅक्सिंग करण्यापूर्वी त्वचा मुलायम व्हावी या उद्देशाने टाल्कम पावडर लावली जाते. पावडरमुळे त्वचेचा ओलसरपणा कमी होतो आणि लव मुळापासून निघते.



दैनिक महाभूमि
सोमवार, १ एप्रिल २०२४
dainikmahabhoomi@gmail.com

# बुलढाणा भूमि




महाविकास आघाडीत बिघाडीचे संकेत

पान ८ वर...

## हवामान अंदाज

सूर्योदय : ६.१८ सकाळी
सूर्यास्त : ६.३९ सायं.

तापमान
कमाल : ३८°
किमान : २४°

## सोने-चांदी

सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) - ६७,३००
सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) - ६८,३००
चांदी (प्रति किलो) - ७५,५००

## थोडक्यात

### श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक केंद्राच्या नवीन वास्तुचे लोकार्पण

**मेहकर :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास केंद्र विवाह संस्कार विभाग यांच्यावतीने सर्वजाती धर्मीय वधू वर परिचय मेळावा आणि नवीन वस्तूचा लोकार्पण सोहळा श्री स्वामी समर्थ केंद्र येथे पार पडला.

यावेळी कृषिरत्न आबासाहेब मोरे, खासदार प्रतापराव जाधव, आमदार डॉ. संजय रायमुलकर हे उपस्थित होते.

भाजप तालुकाध्यक्ष सारंग माळेकर, रामेश्वर महाराज खणपटे, सुभाषराव जाधव, पितळे महाराज, विजय बाजड, माधवराव बाजड, भगवान वायाळ, जुमडे , ताकतोडे, राठोड, देशमुख बापु, धोंडगे, सुनिल गट्टानी, केराव जोशी, प्रदीप पाटील, प्रदीप जोशी, ठाकूर तसेच श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र तथा सर्व सेवा समिती मंडळ भाविक भक्त तसेच सर्व महिला व पुरुष सेवेकरी उपस्थित होते.

संविधानाची अफाट शक्ती, मुक्त विचार अन अभिव्यक्ती: संविधानाचा सन्मान हाचं आमचा अभिमान

# जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत होतोय मतदानाचा जागर

बुलढाणा/प्रतिनिधी

विद्यार्थी दशेपासून विद्यार्थ्यांना आपले संविधान, त्यातील मूलभूत अधिकार, देशातील निवडणूक प्रक्रिया, मतदानाचा अधिकाराची माहिती व्हावी तसेच मतदार नोंदणी आणि विविधस्तरावरील निवडणूक कार्यक्रमाबद्दल ज्ञान वृद्धींगत व्हावे या हेतूने जिल्ह्यातील ३५३ माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आणि वरिष्ठ महाविद्यालयामध्ये 'निवडणूक साक्षरता मंडळ' स्थापन करण्यात आले असून या माध्यमातून जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये मतदानाचा जागर केला जातोय.

सशक्त लोकशाही व्यवस्थेसाठी निवडणूक प्रक्रिया, मतदार नोंदणी आणि जाणीव जागृती यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात




येत आहेत. भारतीय निवडणूक प्रक्रियेविषयी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करुन लोकप्रतिनिधी आणि मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वृद्धींगत करण्यात येत आहे.

या मंडळामध्ये नववी ते पदवी शिक्षणासाठी प्रवेशित सर्व विद्यार्थी सदस्य म्हणून सहभागी आहे. प्रामुख्याने १८ ते २१ वयोगटातील विद्यार्थी विशेष लक्ष्य असणार आहे. सदर मंडळाला शाळा किंवा शैक्षणिक संस्थेचे नाव देण्यात आले आहे. प्रत्येक शाळा, महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता मंच स्थापीत करण्यात येत आहेत. तसेच त्यासाठी शाळेतील अथवा महाविद्यालयातील निवडणूक प्रक्रियेत प्रत्यक्ष काम केलेल्या जाणकार शिक्षकाची प्रभारी म्हणून निवड करण्यात आली आहे. शिक्षकांची निवड करताना राज्यशास्त्राचे अथवा विविध निवडणुकांमध्ये कर्तव्य बजावण्याचा अनुभव असणाऱ्या शिक्षकांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यांना निवडणूक साक्षरता मंचाचे निमंत्रक असे संबोधण्यात येत आहे. जिल्ह्यात एकूण ६०२ शिक्षक निमंत्रक आणि सहनिमंत्रक म्हणून निश्चित करण्यात आले आहेत.

### १५ ते २१ वर्ष वयोगटातील विद्यार्थी राहणार सदस्य

*संबंधित शाळा-महाविद्यालयातील वय वर्षे १५ ते २१ या वयोगटातील सर्व विद्यार्थी या मंडळाचे सदस्य असणार आहेत. निवडणूक साक्षरता मंडळातर्फे आयोजित उपक्रमांच्या संनियंत्रणासाठी सर्व सदस्य विद्यार्थ्यांमधून एक कार्यकारी समिती गठीत करण्यात आली आहे. यात विद्यार्थ्यांची नवमतदार नोंदणी झाली असलेल्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. सदर निवडणूक साक्षरता मंडळाचा कालावधी किमान एक वर्ष अथवा दोन वर्षांपर्यंतचा असणार आहे. या कार्यकारी समितीच्या माध्यमातून सर्व इयत्ताच्या वर्गांमधून निवडणूक प्रक्रिया व मतदार जाणीव जागृतीसाठी विविध कल्पक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील नवमतदार आणि संभाव्य युवा मतदारांनी भारतीय लोकशाही व्यवस्थेचा गौरव वाढविण्यासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांनी केले आहे.*

## 'आता डोळ्यांचे स्कॅनिंग' करुनच मिळणार रेशनचे धान्य



बुलढाणा / प्रतिनिधी

अनेक व्यक्तींच्या बोटांचे ठसे ई-पॉज मशिनवर येत नाहीत. त्यामुळे रेशन धान्य दुकानातून रिकाम्या हातांनी परतावे लागण्याच्या अनेक लाभार्थ्यांच्या तक्रारी होत्या. त्यावर उपाय म्हणून आता प्रत्येक स्वस्त धान्य दुकानात 'आय स्कॅनर गन' दिली जाणार आहे. त्याद्वारे लाभार्थी व्यक्तीचे डोळे स्कॅन करून खात्री केल्यानंतर त्या व्यक्तीला धान्य दिले जाणार आहे. याबाबतचा निर्णय अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने घेतला आहे.

सुरुवातीस लाभार्थ्यांची ई-पॉस मशिनद्वारे बायोमेट्रिक ओळख पटवून शिधावस्तूंचे वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार रास्तभाव दुकानांमध्ये २ जी/३ जी ई-पॉस मशिन बसविण्यात आल्या होत्या. आता ४-जी तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. रेशन धान्य वितरणात पारदर्शकता येण्यासाठी शासनाने जी ई-पॉज यंत्रणा कार्यान्वित केली आहे. ज्या व्यक्तीच्या हाताचे ठसे ई-पॉज यंत्रावर येणार नाहीत.

त्यांचे डोळे स्कॅन करून त्यांना धान्य देण्यात येणार आहे. त्यामुळे, कोणतीही व्यक्ती धान्य मिळण्यापासून वंचित राहणार नाही. आधार कार्ड काढताना डोळ्यांचे स्कॅनिंग करून 'आयरीज' घेतले आहेत. त्यामुळे आय स्कॅन केल्यानंतर आधार क्रमांकाशी त्याची शहानिशा केल्यानंतर संबंधित व्यक्तीची ओळख पटते. त्यामुळे आधार कार्डमधील 'डाटा' येथे उपयोगात येणार आहे, रेशन दुकानात ई-पॉज यंत्र आहे.

मात्र, काही जणांच्या बोटांवरील रेषा पुसट होतात. विशेषत: गवंडी काम करणाऱ्या व्यक्ती, धुणीभांडी करणाऱ्या महिला यांना ही समस्या विशेषत्वाने जाणवते. त्यामुळे ई-पॉज यंत्रावर त्यांचे ठसे उमटत नाहीत. मग, त्यांना कुटुंबातील अन्य व्यक्तींना आणून त्यांचे ठसे देऊन धान्य घ्यावे लागते. संबंधित व्यक्तीला धान्य दुकानदार ओळखत असूनही ई-पॉज यंत्रावरील तांत्रिक अडचणींमुळे त्यांना धान्य देता येत नाहीत. यामुळे नाहक वादाचे प्रसंग उद्भवतात. यासाठी आता शासनाने 'आय स्कॅनर गन'चा पर्याय आणला आहे.

### रेशन दुकानांना मिळणार 'आय स्कॅनर गन'

*रास्त भाव दुकानांना आता 'आय स्कॅनर गन' मिळणार आहे. ज्या व्यक्तीच्या हाताचे ठसे ई- पॉज यंत्रावर येणार नाहीत. त्यांचे डोळे स्कॅन करून त्यांना धान्य देण्यात येणार आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम या योजनेतील अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेऊन धान्याचा होणारा अपहार, गैरव्यवहार थांबविण्यासाठी, लाभार्थ्यांना पारदर्शी पद्धतीने धान्याचे वाटप करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्वत्र सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण करण्यात आले आहे.*

## बालके, स्तनदा व गरोदर मातांना प्रोटिन्सयुक्त पाकिटे मिळणार!

**लोणार :** एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील सहा महिने ते तीन वर्षे वयोगटातील बालक, गरोदर महिला व स्तनदा मातांना आता सात प्रकारच्या धान्यांऐवजी तयार मूगडाळ, तूरडाळ, खिचडी तसेच इतर प्रोटिन्स असलेली पाकिटे घरपोच दिली जाणार आहेत. येत्या काही दिवसांपासून ही पाकिटे लहान बालकांना व मातांना दिली जाणार आहेत. त्यासाठी मे इंडो अलाईड प्रोटिन फूड प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेला मान्यता देण्यात आलेली आहे. यापूर्वी दिले जाणारे सात प्रकारचे धान्य आता बंद केले जाणार आहे.

घरपोच दिल्या जाणाऱ्या धान्य व घटकांचा व्यवस्थित वापर होत नसल्याने आता तयार प्रोटिन आणि तयार खिचडी दिली जाणार आहे. आहाराचा पुरवठा करण्यापूर्वी संबंधित ठेकेदारांनी पाककृतीच्या आहाराचे नमुने एनएबीएल मान्यता प्राप्त लॅबमधून तपासणी करून घ्यावे लागणार आहे.

तसेच त्यापूर्वी उत्पादन केंद्रांतर्गत कार्यरत असलेल्या प्रयोगशाळेमार्फत बॅचनिहाय तपासणी करून टीएचआर आहार मानवीदृष्ट्या खाण्यास योग्य असल्याबाबत अहवाल आहाराचा पुरवठा करताना सादर करावा लागणार आहे. आहाराची सेल्फ लाईफ चार महिने असणार आहे.

### लाभार्थ्यांना मिळणार दोन पाकिटे

*सहा महिने ते तीन वर्षे वयोगटातील सर्वसाधारणत: बालकांना १२५ ग्रॅम १४ दिवस दोन महिन्यांसाठी प्रत्येक लाभार्थ्यास ८७५ ग्रॅमचे एक पाकीट याप्रमाणे दोन पाकिटे मिळून १७५० ग्रॅम, त्यामध्ये ५०० किलो कॅलरीज उष्मांक व १२ ते १५ ग्रॅम प्रथिने यांचा समावेश आहे. गर्भवती व स्तनदा माता यांना मूगडाळ खिचडी १५० ग्रॅम १४ दिवस १०५० ग्रॅमचे एक पाकीट याप्रमाणे दोन पाकीट मिळून २१०० ग्रॅम व सहाशे किलो कॅलरीज उष्मांक व १८ ते २० ग्रॅम प्रथिने यांचा समावेश आहे.*

## युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**डोणगांव :** येथील युवकाने ३१ मार्चच्या सकाळी राजुरकर मंगल कार्यालयाजवळ असलेल्या स्वत: च्या गोठ्यात टिनपत्रा खाली लावलेल्या अँगलला दोरी बांधून गळफास घेतल्याची घटना घडली. डोणगांव येथील मोहनसिंग आनंद सिंह दिनोरे वय ३३ याने स्वत च्या गोठ्यात टिनपत्रा खाली लावलेल्या अँगलला दोर बांधून आत्महत्या केली सदर माहिती मिळताच डोणगाव पोलीस स्टेशन चे नापोकॉ सतिश मुळे व ज्ञानेश्वर घायाळ यांनी भेट देऊन पंचनामा केला.


## इंधनाच्या दरात वाढ; शेती मशागतीचा खर्चही वाढला

**बुलढाणा :** तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात बैलजोडीची जागा आता ट्रॅक्टरने घेतली आहे. शेतकरी शेतात वखरणी, नांगरणी, डवरणी बैलजोडीने न करता ट्रॅक्टरने करुन घेत आहे. परंतु, इंधनाचे दर दिवसेंदिवस वाढत चालल्याने याचा सर्वाधिक मोठा फटका शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे.

भाडेतत्त्वावर शेतीचे काम करणाऱ्या ट्रॅक्टर मालकांनी नांगरणी, वखरणी, रोटावेटर, जमीन सपाटीकरण इत्यादी विविध कामांच्या दरात एकरी पाचशे ते सहाशे रुपयांनी दर वाढविल्याने शेतकऱ्यांचे शेतीचे नियोजन कोलमडले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची शेती करताना नाकीनऊ येत असल्याचे चित्र आहे. पूर्वी मोठ्या शेतकऱ्यांकडे दोन ते चार बैलजोड्या तर लहान अल्पभूधारक शेतकऱ्याकडे सुद्धा किमान एक बैलजोडी तरी असायची. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याकडे बैलजोडी असल्याने शेतीची सर्व कामे बैलजोडीने केली जात होती. परंतु, सध्या शेतकऱ्यांकडे बैलजोडी नसल्याने व डिझेल आणि पेट्रोलच्या भावात भरमसाठ वाढ झाल्याने शेतीच्या मशागती खर्चात भरमसाठ वाढ झाली आहे. आज यांत्रिक स्पर्धेच्या युगात ट्रॅक्टर उधारीत किंवा लोनद्वारे मिळत असल्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या घरी सुद्धा ट्रॅक्टर आला आहे. त्यामुळे शेतीत एक पीक काढले की, त्यावर तीन पीक घेण्याची शेतकऱ्यांची तयारी सुरू होते. ट्रॅक्टर सोबत विविध अवजारे व साहित्य साधनांचा वापर होत असून, त्यासाठी डिझेल वापरले जाते. यंत्रामुळे शेतकऱ्यांची वेळेची व परिश्रमाची बचत होत असली तरी इंधन दरवाढीने शेतीसाठी लागणारा खर्च भरमसाठ वाढला आहे. दरम्यान, परिसरात मजुरांचे दर वाढले आहेत. पूर्वी महिला कामगारांना २५० रुपये प्रति दिवस असा दर होता तर पुरुष कामगारांना ३०० ते ४०० रुपये प्रति दिवस असा दर होता. मजुरांसाठी २०० रुपये वाढवून दिल्यावरही वेळेवर मजूर उपलब्ध होत नाहीत.

## वाढत्या तापमानाचा दुधाळ जनावरांना आजाराचा धोका

बुलढाणा / प्रतिनिधी



गेल्या तीन ते चार दिवसांपासून तापमानाचा पारा ३८ अंश सेल्सिअसवर पोहोचल्यामुळे उष्णता वाढली असून जनावरांना विशेषत: दुधाळ गायी, म्हशींना विविध आजार होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या आजारांमुळे दूध उत्पादनातही घट येऊ शकते. यामुळे जनावरांचे उन्हापासून संरक्षण करा, असे आवाहन पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी केले आहे.

जिल्ह्यात काही दिवसापासून उष्णतेत वाढ झाली असून दुपारच्या वेळी आबालवृद्ध घामाघूम होत आहेत. मनुष्याप्रमाणे पशुधनाच्या आरोग्यावरही उष्ण हवामानाचा परिणाम होतो. त्यामुळे पशुपालकांनाही आपल्या पशुधनाच्या संरक्षणासाठी दक्षता घ्यावी लागणार आहे. पशुपालकांनी पशुधनास कडक उन्हात चरण्यासाठी सोडू नये. लोखंडी हौदामध्ये गरम झालेले पाणी पाजणे टाळावे, दावणीस जनावरे दाटीवाटीने बांधू नये, मृत जनावरांची विल्हेवाट कुरणाच्या ठिकाणी करू नये, पशुधन थंड ठिकाणी दावणीला बांधावे, पशूंना ठेवण्यासाठी गोठा करावा, गोठ्यामध्ये हवा मोकळी राहील याची काळजी घ्यावी, तसेच आजार झाल्यास त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आदिवासी उमेदवारांना विनामुल्य स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण

बुलढाणा / प्रतिनिधी

सुशिक्षित आदिवासी उमेदवारांकरिता कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, अचलपूरतर्फे शासनाच्या विविध पदासाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षेकरीता विनामूल्य प्रशिक्षण देण्यात देण्यात येणार आहे. याचा इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सदर प्रशिक्षण कालावधी हा १ एप्रिल ते १५ जुलै पर्यंत राहणार आहे. या कालावधीत प्रशिक्षणार्थींना दरमहा १ हजार रूपये दराने विद्यावेतन देण्यात येणार आहे. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी विविध विषयांच्या चार पुस्तकाचा संच विनामूल्य देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कालावधीत अटींची पूर्तता करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांचे अर्ज २७ मार्च २०२४ पर्यंत सादर करावेत.

यासाठी उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गातील असावा, उमेदवाराचे किमान वय १८ ते ३० वर्षे असावे, उमेदवार किमान एसएससी परीक्षा उत्तीर्ण असावा, उमेदवाराचे नाव जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात नोंदणी केलेली असावी, तसेच अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, एसएससी उत्तीर्णची गुणपत्रिका, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.अर्जामध्ये स्वतःचे संपूर्ण नाव,मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, प्रवर्ग, जात, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे ऑनलाईन कार्ड, rojgar.mahaswayam.in आदी प्रती व एक पासपोर्ट साईज फोटो जोडणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रशिक्षणासाठी उमेदवार निवडीसाठी २८ मार्च रोजी दुपारी १२ वाजता मूळ कागदपत्रासह मुलाखतीला उपस्थित राहावे.


# निवडणूक रिंगणातील अंतिम उमेदवार स्पष्ट झाल्यानंतरच कळेल मतदारांचा कौल

लोकसभेच्या भूमितून

दीपक नागरे

**सिंदखेडराजा :** लोकसभा निवडणुकांचे पडघम वाजायला लागले आहेत. विद्यमान खासदार प्रतापराव जाधव व प्रा.नरेंद्र खेडेकर यांच्या सोबतच वंचित बहुजन आघाडीच्या वसंत मगर यांच्या नावाची घोषणाही झाली आहे. त्यात शेतकरी नेते रविकांत तुपकर व राजश्री उद्योग समुहाचे संदीप शेळके हे दोन अपक्ष उमेदवार म्हणून शड्डू ठोकून उभे राहिले आहेत. यामध्ये आणखी किती नावाची भर पडते? याचाही अदमास तूर्तास नाही. या पार्श्वभूमीवर सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचा राजकीय इतिहास बघता, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या तारखेनंतर निवडणूक रिंगणातील अंतिम उमेदवार स्पष्ट झाल्यानंतरच मतदारांचा कौल कुणाकडे राहणार हे कळणार आहे.

सद्याची एकुण राजकीय स्थिती पाहता महाविकास आघाडीला मतदारांच्या सहानुभूतीच्या लाटेचा थोडाफार लाभ




मिळण्याची शक्यता आहे.

मात्र याबद्दल मतदारांमधून उघडपणे काहीही बोलल्या जात नाही, महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा.नरेंद्र खेडेकर यांची राजकीय प्रतिमा कुठल्या पार्श्वभूमीवर मोजल्या मापल्या जाते? विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांच्या विरोधात ज्यांनी तगडी लढत दिली होती, ते विद्यमान आमदार, माजी मंत्री व जिल्ह्याचे सहकार नेते डॉ. राजेंद्र शिंगणे हे दोघेही युतीच्या माध्यमातून सोबत आलेले आहेत. दोघांचे राजकीय मनोमिलन झाले असलेतरी, गावागावांतील राजकीय कुरुक्षेत्रावर त्यांच्या कार्यकर्त्यांचा जो कट्टर विरोध आहे, त्यांचे काय? त्यांचे मनोमिलन होईल का? ही खरी गोम आहे.

वंचित बहुजन आघाडीने ऐनवेळी वसंत मगर यांच्या नावाची घोषणा केल्यामुळे आघाडीला मतांचा फटका बसू शकतो हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे. तरीही त्याचा देशपातळीवरील परिणाम लक्षात घेता, आंबेडकरी अनुयायी डोळस भूमिका घेतील का? ही बाब सुद्धा दुर्लक्षित करता येणार नाही. गेल्या वेळच्या लोकसभा निवडणुकीत मुलुखमैदानी तोफ म्हणून ज्यांनी डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या प्रचाराचा झंझावात जिल्हाभरात निर्माण केला होता, ते शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी मतदारसंघाचा कानाकोपरा गाठून आपल्या उमेदवारीची ठोस भूमिका ठिकठिकाणच्या सभांमधून स्पष्ट केलेली आहे. ही बाब सुध्दा महत्त्वाची ठरते.

राजश्री उद्योग समुहाचे संदीप शेळके यांचीही ओळख व भूमिका त्यांच्या तांत्रिक, व्यवस्थापकीय व मुत्सद्दी जाळ्यामधून गावागावात पोहोचलेली आहे. एकंदरीत लोकसभेसाठी कोण कोण संभाव्य उमेदवार आहेत? याबाबत सगळीकडे माहिती व जाणीव असलीतरी, कौल कुणाला राहू शकतो? हे प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात कायम राहणाऱ्या उमेदवारानंतरच कळू शकणार आहे.

## डांबरीकरणाचे काम निकृष्ट झाल्याचा सरपंचाचा आरोप

**भरोसा:** तालुक्यातील वाघाळा ते पोफळ शिवणी रस्त्याचे डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांच्याकडून सुरू आहे परंतु सदर रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा आरोप वाघाळा ग्रामपंचायतचे सरपंच व उपसरपंच यांनी केला असून या संदर्भात त्यांनी सदर कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी एका निवेदनाव्दारे मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

सदर डांबरीकरण हे इस्टीमेटनुसार केले नसल्याचे सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामस्थांचे म्हणणे आहे. परंतु रोडवर कोणत्याही प्रकारचा बोर्ड व साईड भरलेल्या दिसून आल्या नाही. रोडचे लेअर पाहिजे ते या ठिकाणी टाकलेले दिसुन आले नाही. त्यामुळे सदर रोड मोटरसायकलच्या टायरने सुद्धा उखडून निघत आहे. वाघाळा ते पोफळ शिवणी रस्त्याचे काम शासनाच्या इस्टिमेटनुसार होत नसल्यामुळे सदर कामाची कॉलिटी कंट्रोलकडून चौकशी करण्याची मागणी होत आहे.

## शेतकऱ्यांनी महाऊर्जेच्या फसव्या संकेतस्थळापासून सावध राहण्याचे आवाहन

**बुलढाणा:** महाकृषी ऊर्जा अभियान पीएम कुसुम योजनेंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांनी अवैध फसव्या संकेतस्थळापासून किंवा इतर माध्यमांपासून सावध राहावे, असे आवाहन महाऊर्जाने केले आहे.

महाऊर्जामार्फत महाकृषी ऊर्जा अभियान पीएम कुसुम योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ३, ५ व ७.५ अश्वशक्ती क्षमतेचे पारेषण विरहित सौर कृषी पंप देण्यात येते. याकरीता सौर कृषी पंपासाठी पात्र लाभार्थ्यांना सौर पंपाच्या क्षमतेनुसार खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांना १० टक्के आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरण्यासाठीचा एसएमएस पाठवला जातो. सदर योजना राबविण्याकरीता महाऊर्जामार्फत स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात आले आहे. लाभार्थी शेतकऱ्यांनी याच संकेतस्थळांचा उपयोग नोंदणी व इतर माहिती प्राप्त करण्याकरीता करावा. लाभार्थ्यांनी kusum.mahaurja.com याव्यतिरिक्त महाऊर्जातर्फे कोणत्याही प्रकारे शेतकऱ्यांचे अर्ज स्वीकारण्यात येत नाहीत. सद्य:स्थितीत वेगवेगळ्या बनावट वेबसाईट, सोशल मिडीया प्लॅटफार्म इत्यादींमार्फत शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करण्यात येत असल्याचे, तसेच शेतकऱ्यांना लाभार्थी हिस्सा भरण्यासाठी खोटे संदेश पाठविण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा खोटे, फसवे संकेतस्थळ, फसवे दुरध्वनी, भ्रमणध्वनीचे संभाषण, आवाहनाला शेतकऱ्यांनी बळी पडू नये. अशा संकेतस्थळ, ॲपवर कोणत्याही पद्धतीने पैशाचा भरणा करू नये, असे आवाहन विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा अमरावती यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी जिल्हा कार्यालय, महाऊर्जा, अकोला दुरध्वनी क्र. ०७२४-२४५२३११ व domedaakola@mahaurja.com वर संपर्क साधावा, तसेच विभागीय कार्यालय, महाऊर्जा, अमरावती दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१६१० व domedaamravati@mahaurj.com वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आयकरची आघाडी

*काँग्रेस पक्षाला आयकर विभागाने ऐन निवडणुकीच्या तोंडावर नोटीस देऊन पुरते अडचणीत आणले आहे. पूर्वी राजे-रजवाड्यांच्या काळात शत्रूला अडचणीत आणण्यासाठी धान्य, दाना पाणी, दारुगोळा चिजवस्तूची देवाणघेवाण बंद करून रसद तोडली जाई. यामुळे शत्रू जेरीस येऊन नाइलाजे शरणागती पत्करत असे, आज केंद्र सरकारने हीच नीती अवलंब करुन काँग्रेसचे दाणापानी बंद करण्याची तजवीज केली असे दिसते. काँग्रेसला मिळालेली आयकरची नोटीस ,गोठविलेली खाती पाहता काँग्रेसची आर्थिक नाडी बंद करण्याचा पुरेपूर प्रयत्न होत आहे. विशेष बाब म्हणजे सरकारी यंत्रणेचे सहाय्य यासाठी घेतले गेले आहे. ज्या मुद्द्यावर काँग्रेसला आयकर विभागाने नोटीस दिली तीच कारवाई भारतीय जनता पक्षयावर करण्याची हिंमत आयकर विभागात आहे का? हा मुख्य प्रश्न आहे.*

*या विरोधात आज काँग्रेस कार्यकर्त्यांनी देशभर निदर्शने केली, ठिकठिकाणी ही निदर्शने होत असताना अशाच पद्धतीची कारवाई भारतीय जनता पार्टीवर अपेक्षित असताना भाजप मात्र सुखेनवं आहे. त्यामुळे आयकर विभागाने केलेली ही कारवाई सूडबुद्धीची असल्याच काँग्रेसने म्हटलेय. भाजपला ४,६१७ कोटींचा दंड का नाही? असा सवाल काँग्रेस नेत्यांनी उपस्थित केला आहे. आयकर विभागाने कर परताव्यातील कथित तफावतीबद्दल १,८२३.०८ कोटी रुपये भरण्यासाठी काँग्रेसला नव्याने नोटीस बजावल्या. मात्र, भाजपला अशाच प्रकरणात ४,६१७ कोटी रुपयांचा दंड होऊ शकत असतानाही त्याकडे सोयीस्कर डोळेझाक केली, असा आरोप काँग्रेस कडून आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर खाती गोठवण्यात आल्याने निधीच्या तुटवड्याला सामोरे जात असलेल्या काँग्रेससाठी आयकरच्या या नव्या नोटीस पुन्हा एक धक्का मानला जातो. निवडणुकीपूर्वी समान संधी हिरावून घेण्यासाठी हे सर्व केले जात आहे, असे अजय माकन म्हणाले आहे.पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी काँग्रेसच्या सर्व राज्य घटकांना शनिवारी आणि रविवारी नव्या नोटीसविरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यास सांगितले आहे. त्यानुसार ऐन निवडणूक काळात प्रचार-प्रसारा ऐवजी रस्त्यावर आंदोलन करण्याची वेळ काँग्रेस वर आली आहे. काँग्रेसपाठोपाठ भारतीय कम्युनिस्ट पार्टीला (भाकप) आयकर विभागाकडून नोटीस मिळाली आहे. त्यात कर परतावा भरतांना जुने पॅनकार्ड वापरल्याबद्दल ११ कोटी रुपये भरण्यास सांगितले आहे.*

*तृणमूल पक्षाला गेल्या ७२ तासांत आयकर विभागाकडून ११ नोटिसा मिळाल्या आहेत, असे तृणमूल काँग्रेसचे खासदार साकेत गोखले यांनी म्हटले आहे. एकूणच काय तर विरोधकांना पुरते गुंतवून ठेवण्याची ही खेळी दिसते. लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपने निवडणूक रोखे घोटाळ्याद्वारे सुमारे ८,२५० कोटी रुपयांच्या देणग्या गोळा केल्याचे संपूर्ण देशाला कळले आहे, असे पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश काल म्हणाले.१४ लाख रुपये उल्लंघन असल्याचे दाखवून आयकर विभागाने पक्षाच्या बँक खात्यांतून १३५ कोटी रुपये बळजबरीने काढून घेतले आहे, असा आरोप देखील केला जातोय. काँग्रेस हा देशातील मोठा विरोधी पक्ष आहे. काँग्रेसचे खचिकरण झाले, त्यासाठी वेगवेगळ्या संस्थांचा वापर केला तर प्रादेशिक पक्षांशिवाय विरोधक उरणार नाही. सीबीआय आयकर, ईडी अशा संस्था हाताशी धरुन जे राजकारण सध्या केले जात आहे, अशाच पद्धतीने ते पुढे चालू राहिल्यास लोकशाही संपल्यात जमा होईल. विरोध करताना किमान एक पातळी राखली गेली पाहिजे. सध्या मात्र राजकारणासाठी वाट्टेल ते सूत्र वापरुन सगळीच पातळी सोडली जात आहे.*

# पुढचा काळ फ्लाईंग टॅक्सीचा

## लक्षवेधी

● मंजिरी ढेरे

वाढती लोकसंख्या, कितीही रुंद केले तरी अपुरे ठरणारे रस्ते, वाहतुकीच्या अतिरिक्त ताणाने सतत दबावाखाली वावरणारी सार्वजनिक आणि वैयक्तिक परिवहन यंत्रणा हे एकाच नव्हे तर अनेक देशांमधील दृश्य आहे. मात्र अलिकडेच चीनमध्ये स्वयंचलित फ्लाईंग टॅक्सीची चाचणी यशस्वी झाल्यामुळे भविष्यात आपल्याकडेही अशा उडत्या प्रवासी टॅक्सी उपलब्ध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अलिकडेच चीनमधील गुआंगडाँग प्रांतात जगातील पहिल्यावहिल्या स्वयंचलित इलेक्ट्रिक फ्लाईंग टॅक्सीची यशस्वी चाचणी घेण्यात आली. 'इव्हीटॉल' या नावाने ओळखल्या जाणार्या या प्रवासी टॅक्सीमध्ये एका वेळी पाच प्रवासी प्रवास करू शकतील. सहाजिकच चाचणीला मिळालेले यश ही दळणवळण यंत्रणेतील मोठी हवाई क्रांती म्हणावी लागेल. शेन्झेन ते झुआई या हवाई मार्गावरील ही चाचणी यशस्वी ठरली. या फ्लाईटने ३० मैलांचे अंतर साधारणपणे २० मिनिटांमध्ये पार केले. एरवी या मार्गाच्या कारप्रवासाला साधारणपणे तीन तासांचा कालावधी लागतो. यावरुनच तिची उपयुक्तता लक्षात घेऊ शकते. आणखी काही तपासण्या पार पडल्यानंतर ही सेवा प्रत्यक्षात सुरू होईल तेव्हा एक मैलाचा दगड रोवला जाईल, असेच आत्ता आपण म्हणू शकतो.

या ऑटो टॅक्सीने टेक ऑफ केले आणि अवघ्या २० मिनिटांमध्ये झुआई येथील जियुझू पोर्टवर यशस्वी लँडिंग केले. प्रति तास दोनशे किलोमीटर अंतर कापण्याची या फ्लाईंग टॅक्सीची क्षमता आहे. 'ऑटोफ्लाईट' कंपनीचे अध्यक्ष तियान यू यांनीही ही हवाई प्रवासातील नव्या क्रांतीची एक छोटीशी चुणूक असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

शहरी भागातील वाहतूक कोंडीवर रामबाण उपाय म्हणून इलेक्ट्रिक फ्लाईंग टॅक्सीचा पर्याय अमलात आला आणि त्याच्या प्रायोगिक चाचणीला उत्तम यश प्राप्त झाले. सुरक्षित, विश्वासार्ह आणि प्रदूषणमुक्त प्रणालीमुळे शहरी भागात ही सुरूवात कमालीची लोकप्रिय होईल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. सध्या अशा १०० टॅक्सींचे बुकिंग झाले आहे. व्हर्टिकल टेक ऑफ आणि लँडिंग हे या इलेक्ट्रिक फ्लाईंग टॅक्सीचे अनोखे वैशिष्ट्य आहे. तिच्या साह्याने लघू ते मध्यम टप्प्यातील अंतर सहज कापले जाऊ शकते आणि वेळेचीही बचत होऊ शकते, असे या चाचणीच्या यशस्वितेनंतर तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. ऑटो फ्लाईटचे हे नवतंत्रज्ञान जागतिक स्तरावर पोहोचावे, हा या कंपनीचा उद्देश असून त्यानुसार आता वेगाने पावले उचलली जाणार आहेत.

याची सुरूवात गेल्या वर्षी २८ डिसेंबर रोजीच झाली होती. पहिल्या व्यावसायिक उड्डाणाकडे लक्ष ठेवत पूर्णपणे मानवरहित, स्वायत्त प्रवासी ड्रोन उडवले गेले आणि याविषयीच्या प्रयोगाचा प्रारंभ झाला. ते ड्रोन १६ वेगवेगळ्या रोटर्सचा वापर करून आणि पूर्णपणे इलेक्ट्रिक बॅटरीद्वारे, पायलटशिवाय मानवी प्रवाशांची वाहतूक करण्यास सक्षम होते. तसेच ते सामान्य हेलिकॉप्टरपेक्षा अत्यंत कमी आवाज करणारे तसेच प्रदूषणविषयक आदर्श नियमांचे पालन करणारेही होते. त्यानंतर यासंबंधीच्या अन्य चाचण्या टप्प्याटप्प्याने घेतल्या गेल्या आणि सरतेशेवटी चीनने फ्लाइंग कारची यशस्वी चाचणी केली. यातील २१६-ड ही श्रेणी फक्त २२ मैलांच्या गटात आहे. याउलट, सर्वात लोकप्रिय नागरी मॉडेल, रॉबिन्सन टी ४४ हे असून ते एका उड्डाणात एकदा बॅटरी चार्ज केल्यानंतर ३४१ मैलांपर्यंत जाऊ शकते. ही प्रवासी आणि सामानाचे कमाल वजन वाहून नेणारी सध्याची सर्वात अत्याधुनिक हवाई टॅक्सी आहे.

तसे पहायला गेले तर माणसाला आधीपासूनच उडत्या तबकड्या, उडती वाहने, टॅक्सी आदींचे आकर्षण होते. १९३० च्या दशकातच फ्लाइंग कारवर संशोधनाला सुरूवात झाली होती. विमानचालन प्रवर्तक जुआन दे ला सिएर्व्हा आणि हॅरोल्ड पिटकेर्न यांनी 'ऑटोगाइरो' (ज्याला ऑटोगिरो असेही म्हणतात) नावाचे विमान विकसित केले होते. या ऑटोगायरॉसमध्ये फिरणारा रोटर होता, परंतु रोटर उर्जाविरहित असून थ्रस्ट वेगळ्या इंजिनमधून आला होता. या वाहनाला टेकऑफ करण्यासाठी धावपट्टीची आवश्यकता होती. अर्थातच हे सगळे प्रायोगिक तत्वावर होते. त्यामुळेच अशी वाहने लांब पल्ल्याचा प्रवास करू शकतील आणि काही नियमित रस्त्यावरूनही चालवता येतील की नाही, याविषयी तेव्हा स्पष्टता नव्हती. त्यामुळेच त्या अर्थाने या फ्लाइंग कार प्रायोगिक अवस्थेत होत्या.

पुढे पिटकेर्न यांना राष्ट्राध्यक्ष हर्बर्ट हूवर यांच्याकडून या कार्यासाठी बक्षीस मिळाले आणि या प्रसंगी एक



ऑटोगायरो व्हाईट हाऊसच्या दक्षिण लॉनवर उतरला. पण त्यानंतर या संकल्पनेवर अपेक्षित वेगाने काम झाले नाही. प्रयोगाचे पुढचे टप्पे आवश्यक त्या वेगाने पुढे गेले नाहीत. अर्थात जाणकार याचा दोष जागतिक घटनांना देतात. तेव्हाच्या मंदीच्या काळात क्वचितच कोणी अशा उडणार्या कारचा, टॅक्सीजचा विचार केला असता! द्वितीय विश्वयुद्धात ऑटोगायरॉसमध्ये जाऊ शकले असते ते सगळे सामान युद्ध प्रयत्नांसाठी मागवले गेले. युद्धाच्या शेवटी ऑटोगायरो उडू शकत होते परंतु एक वैयक्तिक वाहतूक बनण्यासाठी ते खूप महाग होते तसेच त्याचे नियंत्रित करणेदेखील अत्यंत कठीण होते.

पुढच्या काळात शोधकांनी अशी विमाने आणि हेलिकॉप्टर बनवण्याचा प्रयत्न केला, जे प्रवासी कार म्हणूनही काम करू शकतील किंवा सामान्य नागरिकांसाठी सहज चालवता येतील. यात १९४६ च्या 'एरोकार' (पंख असणारी आणि फियाटसारखी दिसणारी कार)पासून १९५९ च्या 'फ्लाइंग जीप' पर्यंतचा विचार करावा लागेल. अर्थातच प्रायोगिक अवस्थेतील या मॉडेल्समध्ये, डिझाइनमध्ये बर्याच तांत्रिक समस्या होत्या. तांत्रिक प्रगतीचा अभाव आणि उच्च किंमत हाच त्यातील मुख्य अडथळा होता. एका लक्झरी कारच्या किंमतीच्या तिप्पट किंमतीत फ्लाइंग कार उत्तम प्रकारे काम करू शकेल, असे तेव्हाच्या तज्ज्ञांना समजले होते. खेरीज सांस्कृतिक प्रतिक्रिया आणि उच्च-शक्ती तंत्रज्ञानातील प्रयोगांमधील कच्चे दुवेही हा विचारप्रवाह बंद करण्याचे काम करत होते. लोकांमध्ये अशा प्रकारच्या वाहनांची अवास्तव भीती असण्याचा तो काळ होता. त्यामुळेही तेव्हाच्या परिस्थितीने स्वप्नांच्या भविष्याचा पाठपुरावा करण्यापासून रोखण्याचे काम केले. खेरीज प्रवासी ड्रोन कारची जागा घेतील हा विचार स्विकारणारे जग घडण्यासाठी येणारे अडथळे तांत्रिकपेक्षा सामाजिक स्वरुपाचेही होते. म्हणूनच चार वर्षांपूर्वी सेल्फ-फ्लाइंग एअर टॅक्सींविषयक माहिती जाहीर झाली तेव्हा जनतेकडून तीव्र विरोध होण्याचा मोठा धोका होता. इलेक्ट्रिक वर्टिकल टेक ऑफ/लँडिंगबद्दल अनेकांनी शंका उपस्थित केल्या. खेरीज प्रति फ्लाइट भरभक्कम शुल्क आकारत असल्याने या फ्लाईंग कॅबपेक्षा हेलिकॉप्टरचा वापर करणे कधीही स्वस्त ठरेल, असेही काहींचे उपरोधिक मत होते.

अर्थात आता तंत्रज्ञानही अफाट आणि अचाट वेगाने पुढे गेले आहे. त्याचबरोबर महत्त्वाची बाब म्हणजे सामाजिक दृष्टिकोनही बदलला आहे. वाढत्या तांत्रिक क्षमतेवर सर्वसामान्यांचा विश्वास बसत आहे. विमानातील बॅटरी किंवा फ्युएल सेल सिस्टीमची श्रेणी जाणत असल्यामुळे ही रचना आता विश्वासार्ह ठरत आहे. मुख्य म्हणजे इलेक्ट्रिक कार बॅटरीसाठी सरकारी अनुदाने (विशेषत: चीनमध्ये) आणि ग्रीन हायड्रोजन हे तंत्रज्ञान कसे विकसित होते आणि ते किती कार्यक्षम आहे तसेच भविष्यात ते किती मोठी भूमिका बजावू शकते, यावर आता भरपूर भाष्य होत असून त्याविषयीची जनजागृतीही मोठ्या प्रमाणावर झाली आहे. लोकांचा दृष्टीकोन बदलण्यावर या अनुकूल बदलांचा निश्चितच परिणाम दिसत आहे. सध्या पेट्रोलियम पदार्थ जाळणे, ग्लोबल वॉर्मिंगचा वाढता वेग, हवेचे वाढते प्रदूषण, अधिक गोंगाट हे आणि यासारखे मुद्दे जागतिक पातळीवर बहुचर्चित आहेत. लोकांचा प्रवास सुकर आणि वेगवान करण्यासाठी रस्ते अपुरे पडत आहेत. त्यामुळेच आजच्या हवाई वाहतूक नियंत्रण क्षमतांमध्ये नाट्यमय सुधारणा न करता परिस्थिती बदलणे शक्य नाही, हे स्पष्ट झाले आहे. याचाच दुसरा अर्थ असा की आता फ्लाईंग टॅक्सीलादेखील पर्याय नाही.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे इलेक्ट्रिक स्वयंचलित फ्लाईंग टॅक्सी शांतपणे आणि कार्बनमुक्त प्रवास करत असल्यामुळे मानवाकडून होणार्या अनेक चुका टळणार आहेत. सबसिडी देऊन आणि त्यासाठी नियामक मार्ग मोकळा करून आपणही हे नवतंत्रज्ञान आणि प्रवासाचे नवे परिमाण अंगिकारु शकतो. भारतासारख्या झपाट्याने विकासवाटेकडे निघालेल्या देशासाठीही ही बाब महत्त्वाची आणि उपयुक्त ठरणारी आहे. त्यामुळेच चीनच्या पाठोपाठ आपल्याकडेही अशा उडणार्या प्रवासी टॅक्सी पहायला मिळतील अशी आशा करु या.

# स्वत:लाच रचीत गेलो...

## कवडसा



● - डॉ.एस.एम.कानडजे
सरस्वती नगर, बुलढाणा.
भ्रमणध्वनी - ९४२२९२६३८७

**आकाशाच्या मुद्रेवर**
**अवलंबून राहिलो नाही,**
**उगीच कुणाला**
**सलाम ठोकणे जमलेच नाही.**

**प्रेषित खूप भेटलेत**
**हेही काही खोटे नाही,**
**स्वत:लाही उगीचच**
**हात जोडताना पाहिले नाही.**

**वावरलो हरेकांत**
**हरेकांना दिसू आलोच नाही,**
**आम्ही असे कसे ?**
**असा प्रश्न स्वत:लाही केला नाही.**

**कळप करून**
**ब्रम्हांडात हंबरत हिंडलो नाही,**
**स्वत:लाच रचीत गेला**
**ही सवय गेलीच नाही.**

स्वत:लाच रचीत गेलो ही कविवर्य नारायण सुर्वे यांची कविता आहे. श्री. सुर्वे हे स्वावलंबी आणि आत्मनिर्भर माणसाचे वाङ्.मयीन प्रतीक आहे. ही कविता त्यांच्या वैचारिक व्यक्तिमत्वाचा काव्यात्मक आविष्कार आहे. या कवितेचा नायक आणि निवेदक स्वाभिमानी आहे. त्याला स्वत:च्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव आहे. तो नशिबावर हवाला ठेवून जगत नाही, त्याला दैववाद मान्य नाही. त्याचा स्वत:च्या परिश्रमावर विश्वास आहे. 'आकाशाच्या मुद्रेवर अवलंबून राहिलो नाही' अशी त्याला स्वत:च्या सत्त्वाची आणि अस्तित्वाची वस्तुनिष्ठ जाणीव आहे. कारण तो स्वत:ला प्रवाहप्रतित आणि गतानुगतिक समजत नाही. याउलट आपणच आपल्या व्यक्तिमत्वाचा शिल्पकार असल्याची त्याला धन्यता वाटते आहे.

या काव्यनायकाला लाचारीचा तिटकारा आहे. 'उगीचच कुणाला सलाम ठोकणे जमलेच नाही' या त्याच्या विधानात आत्मप्रत्यय आहे. तो आपल्या स्वार्थासाठी जीहुजूरी आणि मुजरेगिरी करीत नाही. कारण तो दैववाद जाणीवपूर्वक नाकारतो आणि प्रयत्नवाद सहेतुकपणे स्वीकारतो. तो मेहरबानी आणि मिंधेपणा याचा निर्धारपूर्वक तिरस्कार करतो. त्याच्याजवळ इच्छाशक्ती आणि निर्णयस्वातंत्र्य आहे. तसेच मूल्यजाणीव आहे.

स्वत:ला घडविणारा हा काव्यनायक आपली वाट स्वत: चोखाळणारा आहे. तो अनुकरणप्रिय नाही. त्याला विचारांची उसनवारी मान्य नाही. त्याला आयते विचार नको आहेत. समाजात अनाहूत सल्ला देणारे पुष्कळ असतात. प्रेषिताचा आव आणणारे स्वयंघोषित विचारवंत तर अनेक भेटतात. असे तथाकथित मार्गदर्शक आपल्याला अनेक भेटलेत, असे हा नायक प्रांजळपणे कबूल करतो. पण या काळजीवाहू सल्लागारांना तो जुमानत नाही, 'स्वत:लाही उगीचच हात जोडताना पाहिले नाही' हा त्याचा या संदर्भातील अनुभव पुरेसा बोलका आहे.



मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. त्याची इच्छा असो वा नसो, तो समाज सोडून जगू शकत नाही. त्यामुळे तो समाजाशी फटकून वागूही शकत नाही. पण समाजातील सामान्य माणसे परंपराशरण असतात. ते रूढिवादी आणि आज्ञाधारक असतात. ह्या भोळ्या भाबड्या सामान्य जनात हा काव्यनायक वावरला; पण तो त्यांच्यासारखा तकलादू नसल्यामुळे त्याला त्यांच्याशी समरस होता आले नाही. अर्थात आपली फसगत झाली आहे, आपण वेगळे पडलो आहोत, असेही त्याला कधी वाटले नाही.

याचा अर्थ या कवितेचा नायक विचारशील आहे. त्याला आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची जाण आहे. आपल्या रास्त अस्मितेचे भान आहे. तो अनेकांत मिसळतो, पण आपले वेगळेपण जपतो. 'रंगूनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा हा त्याचा बाणा आहे. जेथे जातो तेथे, मी माझा सांगाती' अशी त्याची नवी भूमिका आहे. अर्थात आपल्या वेगळेपणाची त्याला खंत नाही. आपण दिशाहीन आहोत, चुकलेल्या वाटेचे प्रवासी आहोत, असा अपराधभाव त्याच्या मनात नाही. तो अनेकांमध्ये जातो, त्यांच्याशी समरस होतो आणि आपले वेगळेपण जपतो; यातच त्याचे मोठेपण आहे.

स्वत:लाच रचीत आणि घडवीत वाटचाल करणारा हा नायक एक जागृत आणि तत्पर ध्येयपथिक आहे. तो आपले सत्त्व आणि स्वत्व याची जाणीवपूर्वक जागृत जोपासना करतो. त्याचे व्यक्तित्व तेजस्वी आणि ओजस्वी आहे. त्यांच्या जाणिवा सतेज आणि धारदार आहेत. त्याची जीवनदृष्टी पीळदार, सकारात्मक आणि आशावादी आहे. तो देवाधर्माच्या नावाखाली विकारवश होणाऱ्या माणसांच्या कळपात हंबरत हिंडत नाही. कारण तो स्वतंत्र विचाराचा असून आत्मप्रत्ययाशी प्रामाणिक आहे. त्याला 'माणूस' पणाचे भान आहे. तो स्वत:ला रचण्याची भाषा करतो. त्याचा आपल्या कर्तृत्वावर विश्वास आहे. केवळ जगणे हे त्याचे प्रयोजन नाही, आपल्या व्यक्तिमत्त्वाचे शिल्प घडविणे हा त्याचा ध्यास आहे.

नारायण सुर्वे यांनी आपल्या कवितेत साकार केलेला हा माणूस बळकट आणि दणकट आहे. त्याच्या ऊरात अभंग आवेश आहे. त्याची कृती मूल्यसन्मुख आहे. त्याला आपल्या अस्तित्वाचे आणि कर्तृत्वाचे चांगले भान आहे. त्याला अज्ञात शक्तीच्या कृपेचा लोभ नाही, कुणालाही लाभासाठी सलाम ठोकणे त्याला जमत नाही. आपल्या अस्मितेच्या मुळावर येणारे मिंधेपण त्याला घृणास्पद वाटते. तो आपली बुद्धी गहाण ठेवून जगत नाही. तो माणसांचा द्वेष करीत नाही, तो त्यांच्याशी फटकून वागत नाही. स्वत:ला रचणे हे तो आपले जीवनमूल्य मानतो, 'आत्मसन्मानाने जगणे' यातच त्याला जीवितसाफल्य वाटते. 'स्वत:ला रचीत गेलो' हे पालुपद आळवणारा हा नायक प्रतिकूल परिस्थितीत तावून-सुलाखून निघाला आहे. देवावर न विसंबणे, कुणापुढेही न झुकणे, जिद्दीने जगणे, उमेदीने वागणे, आत्मसन्मानाची जाणीवपूर्वक जोपासना करणे आणि स्वत:च स्वत:चा भाग्यविधाता होणे, हा त्याचा जाहीरनामा आहे.

# सबसिडी बिब्सीडी एप्रिल फूल

## प्रासंगिक

● संदीप राऊत, बुलडाणा

बायको म्हणली की, ''का हो? गॅस इतका महाग झाला. या गरीब लोकायले कसं परवडत असीन?'' मी म्हणलो, ''गरीबच काय नोकरी वाल्याले बी जड हाय हे. अगं त्यासाठी सरकार सबसिडी देत असते ना पण.'' ती म्हणली, ''चांगलं आहे बाप्पा हे. का हो, आपल्याले बी त सबसिडी भेटत असन ना?'' मी म्हणलो, ''हो, आपल्या खात्यावर सुद्धा जमा होते न.''
''अहो मग गेल्या वर्षभरात चांगली जमा झाली असन ना.....''
माझी ट्यूब पेटली. मी लगेच मोबाईल वरून बँकेचं स्टेटमेंट काढलं एक महिन्याच.



भरभर नजर मारली....कुठच सबसिडी दिसे ना. मला वाटलं आपलं अकाउंट जोडेल नसन नाही त. मी सुज्ञ नागरिक म्हणून कस्टमर केअर ला कॉल लावला.
''गॅस सर्व्हिस मध्ये आपले स्वागत आहे. सबसिडी विषयक तक्रारी साठी एक दाबा......अभिप्राय बद्दल दोन दाबा.......अमुक साठी.....तीन दाबा.....
असं झाल्यावर....
''बोला काय सहायता करू शकते मी आपली?.....''
''हॅलो मी अमुक तमुक माझ्या खात्यावर एकही सबसिडी अजून जमा कशी झाली नाही?'' ''नक्कीच सर, तुमचं अकाउंट नंबर सांगा.....पूर्ण नाव सांगा....हाच मोबाईल नंबर आहे का?ज्यावरून तुम्ही बोलत आहात?
''हो हाच नंबर अन् हाच मोबाईल नंबर आहे ना ताई''
''आपल्याला सांगायला मला आनंद होतोय की ..... आपली सबसिडी जमा झालेली आहे सर.''
मला एकदम हायस वाटलं.
ती सांगू लागली, ''दिनांक १४ फेब्रू ला शेवटचे सिलेंडर घेतले होते तुम्ही. २० तारखेला जमा झाले असेल.''
जीव भांड्यात पडला. मी म्हणलो, ''लय धन्यवाद....!!''
मग पुन्हा एकदम ६ महिन्याच बँक स्टेटमेंट काढलं नेट बँकिंग वरून. मनात म्हणलं ''बघू तरी किती जमा झाली''
मनोमन ठरवून टाकलं हे बायकोला द्यायचे नाही. आपल्याला ठेवून घ्यायचे हे.
हे काय? पुन्हा पुन्हा बारकाईने तपासून बघितलं.....पुन्हा डोकं गरम झालं.
''आयला या कस्टमर केअर वालिन फसोल आपल्याले.....कुठेच तर सबसिडी दिसत नाही.'' आता पुन्हा रागारागाने फोन लावला.
''हॅलो.....हिंदी के लिये एक दाबा....मराठी साठी दोन दाबा......''
काय कटकट आहे साली ही....
तिकडून आवाज आला, ''काय सेवा करू शकतो मी आपली? .....''
''काय दादा हे....आताच तुमच्या कस्टमर केअर सहकारी सोबत बोललो....सबसिडी जमा झाली म्हणते ती.....'' ''नक्कीच सर आपल्या सर्व शंकांचे निरसन होईल'' अन् मग पुन्हा एकदा अकाउंट नंबर, मोबाईल नंबर अन् पूर्ण नाव सांगून झालं.....
'' अहो दादा खरं सांगतो सबसिडीची रक्कम कुठेच दिसली नाही ना बापा''
समोरचा पूर्ण आत्मविश्वासाने सांगत होता. ''.....अहो नीट बघा. जमा झालेली आहे.''
''अहो माझ्या समोर सहा महिन्याचे स्टेटमेंट आहे. मी अगदी बारकाईने तपासून बघितलं आहे.'' ''दिनांक २० तारखेला सबसिडी जमा झालीय.....''
''किती अमाऊंट हाय ते सांगा बरं......''
मी चळीला पेटलो होतो आता. अरे आपल्या हक्काचे आहेत ना, कशाला सोडायचे?
'' दिनांक २० फेब्रुवारीला एकूण ४ रुपये २१ पैसे जमा झालेत.'' ''काय? नीट ऐकू नाही आले, पुन्हा सांगा' '' अहो सर दिनांक २० फेब्रुवारीला एकूण ४ रुपये २१ पैसे जमा झालेत.''
मला ऐकून विश्वासच बसे ना ''काय?ही सबसिडी आहे? मला वाटलं व्याज बीज हाय का.....''
'' आमच्या सर्व्हिस सेंटरला कॉल केल्या बद्दल धन्यवाद.....आमच्या सर्व्हिस मध्ये......''
मला पुढचं काही ऐकू आलं नाही. मले तर चक्करच आले न भौ.....मंग हसू बी आलं.....
बरोबर आहे आज १ एप्रिल ना.....हे बी एप्रिल फुलच म्हणायचं.....!!

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** (अदिती एन्टरप्रायजेस बुलढाणा) यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक-**सुरेश बाबुराव देवकर**, *कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची)
दैनिक महाभूमि
**RNI Tital Code No.MAHMAR 52575** ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)
This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** (Aditi Enterprises Buldhana) Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao**

# अस्मिता

## सुमैयाचे ध्यासपर्व

मानिनी

पश्चिम बंगालमध्ये राहणाऱ्या सुमैया परवीन व्यवसायाने वकील आहेत. गेल्या दोन वर्षांपासून कोणतेही शुल्क न आकारता त्या ॲसिड हल्ल्यातील पीडितांचे खटले लढवत आहेत. तसेच सामाजिक कार्यकर्ता या नात्याने मानवी तस्करीवरही त्यांचे उल्लेखनीय काम सुरू आहे. आजच्या काळात या कामाचे महत्त्व वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. म्हणूनच सुमैया यांच्या कामाचा आवाका प्रत्येकीसाठी प्रेरणादायी ठरेल याची खात्री आहे.

एका सुशिक्षित कुटुंबात जन्म घेऊनही पालकांनी कायमच त्यांना घरात जाणवणाऱ्या, सहन कराव्या लागणाऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष केले. इतकेच नव्हे तर त्याचा सगळा दोष सुमैया यांच्याच माथी मारला. एके दिवशी पेशाने वकील असणाऱ्या काकानेच त्यांच्याशी गलिच्छ गोष्टी केल्या. मात्र कुटुंबाला त्याच्या त्या कृत्याबद्दल सांगूनही सर्वांनी सुमैया यांनाच दोष दिला. गप्प राहण्याचा सल्ला दिला. अशी त्रासदायक परिस्थिती असल्यामुळे २०१३-१४ च्या सुमारास त्या घरातून पळून गेल्या. त्यावेळी सुमैया केवळ १९ वर्षांच्या होत्या. पायात पादत्राणे नाहीत, अंगावर खराब कपडे, जखमेच्या खुणा अशा अवस्थेत त्यांनी घर सोडले होते. खरे तर ही त्यांच्या माझ्या स्वातंत्र्याची वेळ होती. घर सोडून कोलकात्याच्या हावडा ब्रिजवर उभ्या असताना आत्महत्येचा विचारही मनात डोकावून गेला. पण या नकारात्मकतेवर मात करत त्या पाटण्याला एका मित्राकडे गेल्या. त्याच्या साह्याने छोटी-मोठी नोकरी केल्यानंतर एका चांगल्या कंपनीत सुमैया यांना नोकरी मिळाली. त्यानंतर त्यांनी घरी फोन करुन आपण जिवंत असल्याचे सांगितले. त्यांनी पित्याशी फोनवर संपर्क साधला. मी आयुष्यात पहिल्यांदाच माझ्या वडिलांना रडताना पाहिले... असे त्या या संवादाचे वर्णन करताना सांगतात. नंतर वडिलांनी त्यांची माफी मागितली आणि घरी परत येण्याची खूप विनंती केली.

आम्ही तुला पाहिजे ते करायला तयार आहोत, असे सांगितले. त्यामुळे त्या कोलकात्याला परत गेल्या. पुढे वडिलांनी सगळ्यांच्या विरोधात जाऊन सुमैया यांना शिकवले. घरातील सर्वांची इच्छा होती की, आता या मुलीचे लग्न व्हावे पण वडिलांनी आधी आपल्या मुलीचे मत विचारले आणि तुला पुढे शिकायचे आहे का? हा प्रश्न केला. अर्थात सुमैया यांनी त्यास होकार दिला आणि मला कायद्याचे शिक्षण घ्यायचे आहे, असे उत्तर दिले. त्यानंतर



त्यांनी विधी महाविद्यालयात प्रवेश घेऊन कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. अभ्यास करा आणि स्वतःला सिद्ध करा... हाच मंत्र सुमैया आपल्या ला प्रेरणा मानणाऱ्या सगळ्या मुलींना, महिलांना देतात. कायद्याचा अभ्यास पूर्ण करून त्या दिल्लीत स्थायीक झाल्या असून आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी ॲसिड हल्ल्यातून वाचलेल्यांसाठी काम करण्याच्या कामी स्वत:ला वाहून घेतले आहे. त्यांच्या मदतीने अत्याचाराच्या बळी पडलेल्या अनेकींना न्याय मिळाला आहे. सुमैया यांचे हे काम समाजात वेगळी जागरुकता आणणारे आहे हे नक्की.

## भाडेतत्त्वावर राहताय?



जाणून घ्या

सध्या अनेक मुली, महिला शिक्षण वा कामानिमित्त घरापासून दूर वेगळ्या शहरात, गावात राहतात. त्यासाठी पेईंग गेस्ट, होस्टेल, कंपनीने पुरवलेली निवासव्यवस्था आदी पर्याय असले तरी भाड्याने घर घेऊन स्वत:ची स्पेस जपण्यास अनेकजणी प्राधान्य देतात. परंतु काही प्रकरणांमध्ये करार असूनही भाडेकरूला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणूनच भाडेकरूंसाठी असणाऱ्या कायद्यांची, त्यांच्या हक्कांची माहिती असायला हवी.

✲ भाडेकरूंच्या हक्कांपैकी एक म्हणजे घर हे संरचनात्मकदृष्ट्या मजबूत, कीटकांपासून मुक्त आणि पाणी, वीज यासारख्या मूलभूत सुविधांनी सुसज्ज असले पाहिजे. या सर्व गोष्टी भाडेकरूंच्या अधिकारांतर्गत येतात. भाडेकरूने यासंबंधीची बिले भरण्यास उशीर केल्यास मालक कनेक्शन खंडित करू शकत नाही. हे पाऊल केवळ महापालिका अधिकारी किंवा सेवा पुरवठादारच उचलू शकतात.

✲ भारतीय कायदा भाडेकरूंना घरमालकांकडून मनमानीपणे बेदखल करण्यापासून संरक्षण प्रदान करतो. भाडेकरू आणि घरमालक यांच्यातील करार ११ महिन्यांसाठी आहे. दरम्यान, मालक भाडेकरूला घर रिकामे करण्यास सांगू शकत नाही. घरमालक कायद्याने ठरवून दिलेल्या विशिष्ट परिस्थितीतच भाडेकरूला बाहेर काढू शकतात, जसे की भाडे न भरणे, घराचे नुकसान, घराची दुरुस्ती करणे अत्यावश्यक असणे, घरमालकाने मालमत्ता विकली आहे किंवा भाडेकरूने नियमांचे उल्लंघन करणे इ...

✲ भाडेकरूंना घरमालकाकडून कोणताही त्रास झाल्यास वा त्यांच्या हक्कांचे उल्लंघन झाल्यास कायदेशीर मार्ग शोधण्याचा अधिकार आहे. तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी ते योग्य दिवाणी न्यायालय किंवा भाडे नियंत्रण प्राधिकरणाकडे जाऊ शकतात.

✲ भाडेकरूंना घरमालकाच्या अवाजवी हस्तक्षेपाशिवाय गोपनीयतेचा आणि परिसराचा शांततापूर्ण आनंद घेण्याचा अधिकार आहे. घरमालकांनी भाडेकरूंच्या गोपनीयतेचा आदर करणे आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थिती वगळता, घरमालकाला भाडेकरूच्या परवानगीशिवाय मालमत्तेत प्रवेश करण्याचा अधिकार नाही. विशेषत: महिला भाडेकरूंच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे, असे म्हणावे लागेल.

## उन्हाळा...आहाहा!

रसगंधा

आईस्क्रीम हा आबालवृद्धांचा आवडता पदार्थ आहे. असह्य उन्हात आईस्क्रीमची चव चाखायला मिळाली तर ... आहाहा! कल्पना करूनच छान वाटू लागलं आहे. उन्हाळ्यात विविध प्रकारचं आईस्क्रीम घरी करणार असाल तर या रेसिपी तुम्हाला उपयुक्त ठरतील यात शंका नाही.



**ब्लूबेरी कोकोनट पॉप्सिकल्स**

**साहित्य-** दोन कप करवंदाचा गर, चार टेबलस्पून पाणी, पाच टेबलस्पून मेपल सिरप, तीन चतुर्थांश नारळाचं दुध, अर्धा कप बदामाचं दुध

**कृती-** सगळ्यात आधी एका भांड्यात करवंदांचा गर, पाणी आणि तीन टेबलस्पून मेपल सिरप मंद आचेवर उकळून घ्यावं. थंड होण्यासाठी ठेवून द्यावं. दुसऱ्या भांड्यात नारळाचं दूध, दोन टेबलस्पून मेपल सिरप आणि बदामाचं दुध मिसळून घ्यावं. पॉप्सिकल्सचे मोल्ड घ्यावेत. त्यात अर्ध्यापर्यंत ब्लूबेरीचं मिश्रण घालावं. अर्ध्यापर्यंत नारळाच्या दुधाचं मिश्रण घालावं. हे मोल्ड सेट होण्यासाठी फ्रिजमध्ये ठेवून द्यावं. ब्लूबेरी कोकोनट पॉप्सिकल्स तयार आहेत.

**दही आईस्क्रीम**

उन्हाळ्यात दही खाणं ही पर्वणी असते.



अनेक पदार्थांमधून दह्याचा वापर अत्यंत खुबीने केला जातो.

**साहित्य-** अर्धा कप दही, पाव कप साखर, अर्धा कप क्रीम, दोन थेंब व्हॅनिला इसेंस, दहा काजू (लहान काप), चार बिस्कीट

**कृती-** दही आणि साखर मिसळून चांगल्या प्रकारे फेटून घ्यावं. त्यानंतर त्यात क्रीम आणि व्हॅनिला इसेंस टाकून फेटून घ्यावं. मिश्रणात काजूचे काप मिसळून घ्या. त्यानंतर एअर टाईट कंटेनरमध्ये बिस्कीटांचे तुकडे टाकावेत. मिश्रण टाकावं. हे आईस्क्रीम फ्रीजरमध्ये ठेवावं. पाच ते सहा तासांनी आईस्क्रीम तयार होईल.

## गॅजेटमयी होणे धोक्याचे

पॅरेंटिंग

आजकाल दुनिया गॅजेटमयी झाली आहे. मोठ्यांच्या हातातील गॅजेट्स लहानांना हाताळण्याचा मोह होणं सहाजिक आहे. अशा वेळी मुलांना गॅजेट वेडापासून कसं दूर ठेवावं, याविषयी...

✲ **रोल मॉडेल बना-** लहान मुलं आई-वडिलांचं अनुकरण पावलोपावली करत असतात. त्यामुळे पालकांनी शक्यतो मुलांसमोर गॅजेटस वापरणं टाळावं, अथवा गॅजेट्सचा वापर कमी करावा. जेणेकरून मुलं गॅजेट्सकडे आकृष्ट होणार नाहीत.

✲ **गिफ्ट निवडताना काळजी घ्यावी-** मुलांचं वय दहा वर्षांच्या आतील असेल तर त्यांना गॅजेट्स गिफ्ट करणं टाळा.

✲ **योग्य जागेची निवड-** कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप घरात सर्वांना दिसू शकेल अशा ठिकाणी ठेवणं गरजेचं आहे. त्यामुळे मुलं या वस्तू कितीवेळ वापरतात यावर प्रत्येक सदस्याचं लक्ष राहील.

✲ **नो-डिव्हाईस टाईम-** मुलांना चांगल्या सवयी लागाव्यात, यासाठी घरात नियमांचं पालन करण्याचा प्रयत्न करावा. याचप्रमाणे प्रत्येकाने घरात 'नो डिव्हाईस टाईम' पाळणं महत्त्वाचं आहे. या वेळी घरातील प्रत्येकाने डिव्हाईसेस लांब ठेवून गप्पा, घरातले खेळ यांसाठी वेळ द्यावा.



✲ **आउटडोर ॲक्टीव्हिटीही महत्वाची-** मुलं घरात बसून तासंतास गेम्स खेळतात. अशा वेळी त्यांना आउटडोर खेळांसाठी प्रोत्साहन द्यावं. पालकांनी स्वत: सहभागी होऊन प्रोत्साहन दिल्यास मुलं गॅजेट्सपासून लांब राहतील यात शंका नाही.

## बीचवर काळजी घ्या

भटकंती

सुट्टीचे दिवस सुरू आहेत, अशा वेळी सहलींचं प्लॅनिंग केलं जातं. अनेकदा सहलीला जाण्यासाठी बीचची निवड केली जाते. पण समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे केसांचा पोत बिघडतो. अशा वेळी सोप्या ट्रिक्स वापरून केसांची काळजी कशी घ्यावी, याविषयी

✲ समुद्रकिनारी वास्तव्य असेल तोपर्यंत एक दिवसाआड केसांचं कंडिशनिंग करावं. धूळ, ऊन आणि रेतीमुळे केस कोरडे होतात. शक्य असल्यास हेअर मास्कचा वापरही केसांवर करता येऊ शकतो.

✲ समुद्रात जाण्यापूर्वी केस साध्या पाण्याने ओले करून घ्यावेत. त्यामुळे केसांकडून खारं पाणी कमी प्रमाणात शोषलं जाईल.

✲ बीचवर जाताना स्कार्फ आणि हॅट्चा वापर करणं गरजेचं आहे असं अनेकदा ऐकलं असेल. कारण बीचवरील कडक उन्हामुळे चेहऱ्यावर गंभीर परिणाम होतो. पण बीचवर जाताना केवळ चेहराच नाही तर केसांची काळजी घेणंही गरजेचं आहे. हॅट आणि स्कार्फचा वापर केल्याने केसांचं नुकसान टाळणं शक्य आहे.

✲ बीचवर दिवसभर उन्हात राहिल्यानंतर केसांवर ड्रायरचा वापर करणं योग्य नाही. ब्लो ड्रायरने सुकवण्याऐवजी केस नैसर्गिकरित्या वाळवावेत.



✲ बीचवर जाताना केसांसाठी कुठलं प्रॉडक्ट योग्य ठरेल याचा अंदाज घ्या. केसांसाठी ॲंटी फ्रीजिंग प्रॉडक्ट आणि सन प्रोटेक्शन शॅंपूचा वापर करा. तेल किंवा सीरमचा वापरही लाभदायक ठरू शकतो.

## पर्याय शोध, पुढे जा

समुपदेशन

मी पन्नाशीच्या घरातील महिला असून एका छोट्या कंपनीत कार्यरत आहे. पगार फार चांगला नसला तरी या रकमेचा आधार वाटतो. अडीनडीला पैसे पुढे करता येतात. पण आता हा आधार दूर करावा लागतो की काय अशी शंका येतीये. माझ्याकडे वृद्ध सासू-सासरे आहेत. त्याचबरोबरच आता वृद्ध माता-पित्यांची जबाबदारीही माझ्यावर येऊ घातली आहे. एकूलता एक भाऊ नोकरीनिमित्त परदेशी जाणार असल्याने आईवडिलांची जबाबदारी अपरिहार्यपणे माझ्यावरच येणार आहे. आता ते दोघेही थकले आहेत. असं असताना चार वृद्धांची काळजी घेण्यात मी हरवून जातीये की काय अशी शंका येतीये. मला आत्तापासूनच याचं दडपण आलं आहेवर परिणाम होण्याची भीतीही आहे. काय करु, ही स्थिती कशी हाताळू?




– सखी,

मध्यमवयात शरीर आणि मनाची उमेद कमी होत असली तरी जबाबदाऱ्या संपायचं नाव घेत नाहीत. घरातील वृद्धांची जबाबदारी घ्यावीच लागते. पण यामुळे आत्तापासून घाबरुन जाऊ नकोस. सध्या या कामी मदत करणाऱ्या अनेक संस्था आणि व्यक्तींची मदत मिळू शकते. एखादा केअर टेकर नेमण्याचा पर्याय तू निवडू शकतेस. घराशेजारी एखादा रिकामा फ्लॅट असल्यास तिथे या चौघांची सोय करणं योग्य ठरेल. तिथे सगळ्या सुविधा उपलब्ध करुन दिल्यास त्यांनाही निश्चिंतपणे राहता येईल. परस्परांशी संबंध चांगले असल्यास ते अत्यंत समाधानाने एकत्र राहतील. हवा तसा वेळ घालवू शकशील. मुख्य म्हणजे यामुळे तुला नोकरी सोडण्याची वेळ येणार नाही. तेव्हा विचार कर आणि निर्णय घे.

## पार्टीची मौज लुटताना...

ऑफिस ऑफिस

ऑफिस पार्टीमध्ये वरिष्ठांवर प्रभाव पडावा यासाठी अनेकजण प्रयत्न करत असतात. पण ऑफिस पार्टी बिनधास्त वावरण्याची जागा नसते हे समजून घ्यायला हवं. सर्व व्यवस्थापनांमध्ये ताळमेळ असावा, सहकाऱ्यांना जाणून घेता यावं, यासाठी ऑफिस पार्टीचं आयोजन केलं जातं. पार्टीमधील तुमचा वावर आत्मविश्वासपुर्वक असला पाहिजे. पार्टीमध्ये खाणं आणि ड्रिंक्स कशाप्रकारे आणि किती प्रमाणात घ्यावीत, हे ठरवायला हवं. स्वत:बद्दल कितीही आत्मविश्वास असला तरी ऑफिस पार्टीमध्ये प्रमाणाबाहेर ड्रिंक्स घेणं टाळावं. एटीकेट्ससाठी एखादं ड्रिंक्स चालू शकतं. आत्मविश्वासाच्या कमतरतेमुळे अनेकजण ऑफिस पार्टीला जाणं टाळतात. खरं पाहता पार्टीमध्ये न गेल्याने तुमच्या स्वभावातील उर्मटपणा दिसून येतो. ऑफिस पार्टीकडे आव्हान म्हणून न बघता संपर्क निर्मितीची संधी म्हणून पाहणं गरजेचं आहे. पार्टीत गप्पा मारताना नाजूक विषयांवर थेट टिप्पणी



करणं देखील टाळावं. नवीन व्यक्तींशी ओळख करून घेताना स्वत:बद्दल संक्षिप्त स्वरुपात माहिती द्या. पार्टीमध्ये सिनीयर-ज्युनिअर हा भेद नसला तरी वरिष्ठ तुमचे मित्र नाहीत ही बाब विसरू नका. पार्टी सुरू झाल्यापासून संपेपर्यंत थांबणं गरजेचं नसतं. तुम्ही पार्टीतून लवकर निघणार असाल तर टीम मॅनेजरला तशी कल्पना द्यायला विसरू नका. जेणेकरून तुम्ही जबाबदार आहात हे दिसून येईल. पार्टीमधून निघायच्या आधी संयोजकांचे आभार मानायला विसरू नका.

### आरोग्य संपदा

#### ...म्हणून खावा विडा

मुखशुद्धीसाठी पान अर्थात विडा खाणे ही आपल्याकडे पूर्वीपासून चालत आलेली पद्धत आहे.



विडा तयार करताना त्यात समाविष्ट केलेले अनेक घटक आरोग्यास हितकर ठरत असतात. उदाहरणार्थ, पानातील सुपारीमुळे सर्दी-खोकल्याचा त्रास कमी होतो तसेच डोकेदुखीही कमी होते. तसेच तुळशीच्या बियांमध्ये असणारे गुणधर्म घसादुखी आणि खोकल्यापासून आराम देतात. खेरीज तुळशीच्या बिया पानासह खाल्ल्याने पचनक्रिया मजबूत होते. असे पान खाल्ल्यास लाळ ग्रंथी सक्रिय राहण्यास मदत होते. ही ग्रंथी अन्नाचे लहान तुकडे करण्याचे काम करत असल्यामुळे बद्धकोष्ठता, अपचन आणि गॅसची समस्या दूर होण्यासही मदत होते.

### सौंदर्य साधना

#### त्वचा कोरडी पडलीये?

प्रखर सूर्यप्रकाशात फिरल्यामुळे त्वचा कोरडी होते. हा त्रास टाळण्यासाठी त्वचेला अतिरिक्त काळजी आणि पोषण आवश्यक असते हे लक्षात घ्या. त्वचा कोरडी असेल तर चेहरा धुण्यापूर्वी आधी मॉइश्चरायझर लावा. तुम्हाला मॉइश्चरायझर लावायचे नसेल तर बदामाचे तेल लावले तरी चालेल. त्यानंतर काही वेळाने चेहरा धुवा. यामुळे त्वचा मऊ राहते आणि तीव्र प्रकाशामुळे झालेली त्वचेला हानी भरुन निघण्यासही मदत होते.



### उपयुक्त काही

#### करा गोवरीचा धूर

हवामान बदलत आहे. सर्व झाडांवर फुलोरा आला आहे. अशा वेळी डासांची संख्याही वाढते. मात्र



त्यांचा त्रास टाळण्यासाठी कोणतेही तीव्र रसायनयुक्त घटक वापरण्यापेक्षा शेणाच्या गोवरीचा वापर करुन बघा. घराच्या कोणत्याही कोपऱ्यात किंवा खोलीत मडके वा एखादे मातीचे भांडे ठेवून सायंकाळी त्यात गोवरी पेटवा. या धुराने कीटक आणि डास पळून जातातच खेरीज वातावरणही शुद्ध आहे. सध्या शेणापासून बनवलेल्या अगरबत्तीही बाजारात उपलब्ध आहेत. त्या वापरण्यासही सोप्या आहेत. त्यामुळे डास, माशा वा कोळी घराबाहेर ठेवण्यासाठी अशा उदबत्त्या अवश्य वापरा

## असा करा ब्रशचा वापर

ब्युटी मंत्रा

चांगला मेक अप करणं आव्हानात्मक असतं. नवशिक्या महिलांनी मेक अप करताना ब्रशचा वापर केल्यास अडचणी येत नाहीत. मेक अप ब्रशचे प्रकार आणि वापर याविषयी अधिक जाणून घेऊ.

✲ **फाउंडेशन ब्लेंडिंग ब्रश-** हा मेक अपचा सगळ्यात बेसिक ब्रश आहे. फाउंडेशन लावल्यानंतर हळू हळू या ब्रशने त्वचेवर फाउंडेशन पसरावं. गोल आकारात ब्रश फिरवल्याने फाउंडेशन त्वचेवर योग्य प्रकारे पसरलं जातं.

✲ **कन्सिलर ब्रश-** चेहऱ्यावरील डाग लपवण्यासाठी कन्सिलरचा वापर केला जातो. कन्सिलर ब्रशच्या सहाय्याने अधिक चांगल्या पद्धतीने लावलं जातं. डार्क सर्कल, सुरकुत्या, बारीक रेषा लपविण्यासाठी या ब्रशच्या निमुळत्या टोकाने कन्सिलर पसरावं.

✲ **पावडर ब्रश-** कन्सिलरनंतर पावडरचा क्रमांक येतो. त्वचेवर पावडर योग्यप्रकारे सेट होण्यासाठी या ब्रशचा वापर करावा. हा ब्रश ब्लश लावण्याच्या कामीही उपयोगी ठरतो.

✲ **ब्लेंडिंग ब्रश-** आयशॅडो लावण्यासाठी ब्लेंडिंग ब्रश एकदम परफेक्ट आहे. हा ब्रश मुलायम आणि लवचिक असतो. त्यामुळे डोळ्यांवरील त्वचेवर आयशॅडो अगदी सहजतेने लावणं शक्य होतं. शंकू आकारातील ब्रश डोळ्याच्या वरच्या कोनांपर्यंतही सहजपणे पोहचू शकतो.



✲ **हाय लायटर ब्रश-** हा मेक अप किटमधील सर्वात महत्त्वाचा ब्रश आहे. मेक अप खुलवण्यासाठी या ब्रशचा उपयोग होतो. हा ब्रश विरळ असल्याने हायलायटर योग्यप्रकारे सेट होण्यास मदत होते. चीकबोन्स, नाक आणि गाल यांवर या ब्रशने हायलाईट करता येतं.

## थोडक्यात

### २६ वर्षीय युवकाचा मृत्यू

**खामगाव :** शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या शेलोडी येथील २६ वर्षीय युवकाचा आकस्मिक मृत्यू झाल्याची घटना रविवार ३१ मार्च रोजी उघडकीस आली.

शेलोडी येथील रहिवासी दुर्गेश जनार्दन उगले याची ३० मार्चच्या रात्री अचानक प्रकृती खालावल्याने त्याला नातेवाईकांनी उपचारार्थ अकोला येथील आयकॉन हॉस्पीटल येथे दाखल केले होते. मात्र येथे डॉक्टरांनी त्याची तपासणी करून मृत घोषित केले. सदर युवकाचा मृत्यू कशामुळे झाला? याचे कारण मात्र समजू शकले नाही. याप्रकरणी आयकॉन हॉस्पीटच्या डॉक्टरांच्या फिर्यादीवरून खामगाव ग्रामीण पोलिसांनी आकस्मीक मृत्यूची नोंद केली आहे.

### सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर; युवकावर गुन्हा

**शेगाव :** सोशल मीडिया इस्टाग्रामवर आक्षेपार्ह मजकूर टाकून सामाजीक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी शहर पोलिसांनी एका युवकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

अमीर खान हुसेन खान रा. डगडाळीपुरा मोहमद अली चौक शेगाव यांनी शहर पोस्टे.ला फिर्याद दिली की, आझाद नगर मधील मित्राच्या इस्टाग्राम आयडीवर इंग्रजीमध्ये समाजाबाबत आक्षेपार्ह मजकूर आल्याने वाचून धार्मिक भावना दुखावित दोन गटामध्ये शत्रूत्व व व्देष भावना निर्माण केल्याप्रकरणी दर्शित भायाणी रा.मटकरी गल्ली शेगाव याच्याविरुध्द भादंवीचे कलम २९५ (अ), ५०५ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### इसमाचा विहिरीत बुडून मृत्यू

**खामगाव :** विहिरीमध्ये लावलेल्या पाण्याच्या मोटरचा सेक्शन पाईप काढण्यासाठी विहिरीत उतलेल्या ४२ वर्षीय इसमाचा हात सटकून पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवार ३१ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता तालुक्यातील शहापूर येथे उघडकीस आली.

सोनाजी रामराव वाडेकर हे त्यांच्या शहापूर शिवारातील शेतामध्ये विहिरीतील मोटर पंपचा सेक्शन पाईप काढण्यासाठी विहिरीमध्ये उतरले होते. दरम्यान पाईप काढतांना अचानक त्यांचा हात सटकल्याने ते विहिरीत पडले, त्यांना पोहणे येत नसल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी पोलिसांनी गावातील गोताखोरांच्या मदतीने मृतक सोनाजी वाडेकर यांचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी खामगाव येथील सामान्य रूग्णालयात पाठविण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी सोपान देवकर यांच्या फिर्यादीवरुन मर्ग दाखल केला आहे.

रजा हवी ? आता करावा लागणार ऑनलाईन अर्ज..

# कर्मचाऱ्यांसाठी शासनाचे फर्मान; आजपासून आदेश जारी!

**अनुप गवळी**



**खामगाव :** राज्य शासनाच्या सर्वच विभागातील कर्मचाऱ्यांना आता ऑफलाईन रजेचा अर्ज देण्याची पध्दत काळबाह्य झाली असून आता शासकीय कर्मचाऱ्यांसाठी शासनाचे नवे आदेश धडकले असून नविन आर्थिक वर्षात सर्वच शासकिय कर्मचाऱ्यांना रजेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावा लागणार आहे. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसमोर नवीन पेच निर्माण होणार आहे.

महाराष्ट्र राज्य कर्मचाऱ्यांच्या संदर्भातला एक महत्त्वाचा नियम १ एप्रिलपासून बदलणार असून आता राज्य कर्मचाऱ्यांना तथा अधिकाऱ्यांना १ एप्रिलपासून ऑफलाइन पद्धतीने रजेचा अर्ज सादर करता येणार नसून कर्मचाऱ्यांना ऑनलाईन रजा अर्ज सादर करावा लागणार आहे. त्यामुळे २०२४-२५ मध्ये राज्यातील सरकारी अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना रजा घ्यायची असेल तर त्यांना प्रचलित असलेल्या ऑफलाईन पद्धतीने रजा अर्ज सादर करता येणार नाही. तर त्यांना आता ऑनलाईन रजा अर्ज सादर करावा लागणार आहे. नवीन आर्थिक वर्षात हा राज्य कर्मचाऱ्यांच्या संदर्भातला एक महत्त्वाचा बदल राहणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचे आदेश निर्गमित केलेले आहेत. राज्य कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकविषयक बाबीसाठी आता एक नवीन प्रणाली विकसित झाली आहे. ह्यूमन रिसोर्सेस मॅनेजमेंट सिस्टम असे या नवीन प्रणालीचे नाव आहे. याअंतर्गत राज्यातील राज्य कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक आता डिजिटल म्हणजे ऑनलाईन झाले आहे. या नवीन प्रणालीअंतर्गत रजेचा अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करता येणार आहे. सुटी या कॉलममध्ये हा ऑनलाइन अर्ज राज्य कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध राहणार आहे. सुट्टीसाठी ऑनलाईन अर्ज करणाऱ्यांची संख्या कमी असल्याचे आढळले आहे. मात्र आता सर्वांनाच सुट्टीसाठी ऑनलाईन अर्ज करावा लागणार आहे.

**सेवा पुस्तक झाले ऑनलाईन**

*कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक हे आजरोजी ऑफलाईन सुरू होते. कर्मचाऱ्यांच्या कार्याचा आढावा हा लेखी स्वरूपात नोंदविल्या जात होता. मात्र शासनाने सर्वच शासकिय विभाग आता डीजीटल केले असून कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तकही ऑनलाईन प्रणालीत आणण्यात आली असून ह्यूमन रिसोर्सेस मॅनेजमेंट सिस्टम असे या नवीन प्रणालीचे नाव असून या सिस्टमच्या माध्यमातून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे सेवा कार्याची नोंद ऑनलाईन केल्या जाणार आहे.*

**'दांडी' बहाद्दरांना बसणार चपराक**

*कर्मचाऱ्यांना रजा घ्यावयाची असेल तर आता त्यांना ऑनलाईन अर्ज सादर केल्याशिवाय रजा मिळणार नाही. रजेसाठी ऑनलाईन अर्ज करावा लागणार असून सेवा पुस्तकामुळे त्यांच्या कार्यपध्यती थेट शासनापर्यंत पोहोचल्या जाणार असल्यामुळे 'दांडीबाज' कर्मचाऱ्यांना चांगलीच चपराक बसणार आहे.*

# वाढत्या तापमानामुळे वीजेचा अतिरिक्त वापर वाढला

**आवश्यकतेनुसार वीजेचा वापर करावा; महावितरणचे आवाहन**

महावितरण

**खामगाव/प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून शहरातील तापमानात चांगलीच वाढ झाल्याचे दिसून येत आहे. वाढत्या उन्हामुळे नागरिकांची लाहीलाही होत असल्याने एसी, पंखे, कुलर या उपकरणांचा वापर होतांना दिसून येत आहे. त्यातच वाढत्या तापमानामुळे वीजेचा अतिरिक्त वापरही वाढला असून महावितरणकडून आवश्यकतेनुसार तसेच मंजूर वीज पुरवठ्या इतकाच वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसापासून उन्हाची दाहकता वाढली आहे. त्यामुळे विजेच्या मागणीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. वीज बिलांच्या बचतीसाठी वीज ग्राहकांनी आवश्यकतेनुसारच विजेचा वापर करावा. सकाळी ६ ते १० व सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत विजेचा कमीत कमी वापर करून महावितरण विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

विजेच्या बचतीसाठी घर किंवा शासकीय कार्यालयामध्ये भरपूर असलेल्या सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करुन अनावश्यकवेळी घरातील विद्युत उपकरणे, लाईट पंखे बंद ठेवावे.

**या गोष्टी शक्यतो टाळा**

उन्हाळ्यात फ्रिजमधून एक एक भाजी किंवा थंड पदार्थ काढण्याऐवजी आवश्यक भाज्या व पदार्थ एकदाच काढावे. स्वयंपाकासाठी इलेक्ट्रिक शेगडी, तसेच हिटर व एसी यासारख्या अतिदाबाची वीज उपकरणे वापरू नये. अनावश्यक वीज वापर टाळून, महावितरणला सहकार्य करावे.

**-एन.जी.गडपाले,**
**सहा. कार्यकारी अभियंता,**
**खामगाव**

# आगामी निवडणूक व सणांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा रुटमार्च

**नांदूरा/प्रतिनिधी**



छत्रपती शिवाजी महाराज जंयती (तिथीनुसार) मिरवणुकीदरम्यान नांदुरा शहरात घडलेल्या दगडफेक आणि तणावाच्या घटनेमुळे पोलिसांनी सदर बाब गांभीर्याने घेवून शहरातील अतिसंवेदनशील भागात रूट मार्च काढून पाहणी केली.

सध्या सर्वत्र लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ व आगामी सण उत्सव हे भयमुक्त वातावरणात पार पडावे, या पार्शवभुमीवर २९ मार्च रोजी दुपारी नांदुरा शहरात पोस्टे. नांदुरा छोटी मस्जीद, पेठमोहल्ला, कुरेशी मस्जीद, जामा मस्जीद, राठी चक्का, ध्रुव चौक, मोतीपुरा मस्जीद, छत्रपती शिवाज महाराज चौक, सुभाष चौक, मधुबन चौक, डॉ राखोंडे यांचा दवाखाना, वाकोडे एस टी डी-आठवडी बाजार, ताज गेट, मिहाणी चौक उस्मानिया चौक, पोस्टे नांदुरा यामार्गाने पोलीस अधिक्षक सुनिल कडासने यांचे मार्गदर्शनाखाली रुटमार्च काढण्यात आला. या रुटमार्चमध्ये अप्पर पोलीस अधिक्षक अशोक थोरात खामगाव, डीवाय एसपी गवळी मलकापुर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक लांडे, ठाणेदार विलास पाटील, पोलिस निरीक्षक सुरेश नाईकनवरे, आठ अधिकारी, पोस्टे.चे १५ अमंलदार, सीआयएसएफचे ४ अधिकारी, ६८ अंमलदार, आरसीपी पथक, क्युआरटीपथक, १६ होमगार्ड असा एकूण १३ अधिकारी १३४ अंमलदार हे रुटमार्चमध्ये सहभागी झाले होते.

### पोलिसांची वरली मटक्यावर कारवाई

**संग्रामपूर :** सोनाळा पोलिस हद्दीत येणाऱ्या बावनबीर गावात वरली मटका नावाचा अवैध धंदा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. स्थानिक ग्रामपंचायतने अवैधधंदे विरोधात ठराव घेवून जिल्हा पोलिस अधिक्षक यांना निवेदन दिले होते.

बावनबीर गावात वरली मटका नावाचा अवैध धंदा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. याबाबत ग्रामपंचायतकडे तक्रार दाखल झाली होती. त्यावर ग्रामपंचायतच्या मासिक सभेत ठराव घेऊन पोलिस अधीक्षकाकडे पाठपुरावा करण्यात आला. २८ मार्च रोजी सोनाळा ठाणेदार पाटील त्यांच्या सहकाऱ्यांसोबत गावात दाखल झाले. सोनाजी महाराज मंदिराजवळ गोविंदा विजय दामोदर तर येथीलच ईदगाहाजवळ शेख रिजवान शेख मुनाफ हा वरलीचे आकडे घेताना आढळून आल्याने त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई केली.

# संग्रामपूर तालुक्यात वादळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**संग्रामपूर/प्रतिनिधी**



तालुक्यात नुकत्याच झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे शेतातील उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी पुन्हा एकदा निसर्गाच्या माऱ्यापुढे हतबल झाल्याचे दिसून येत आहे. याचबरोबर या वादळी वाऱ्याने शेगाव ते वरवट बकाल मार्गावरील अनेक झाडे उन्मळून जमीनीवर पडली होती.

गुरुवार २८ मार्च रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास जोरदार वादळी वाऱ्याला सुरुवात झाली. वादळी वाऱ्यानंतर अवकाळी पाऊस झाला. या वादळी वाऱ्याने शेगाव ते वरवट बकाल मार्गालगत असलेली बाभळीची अनेक झाडे पडली. काही झाडे रस्त्यावर पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती, तसेच या भागात असलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काढणीला आलेला गहू, हरभऱ्याचे पीक निसर्गाच्या लहरीपणामुळे उद्धवस्त झाले. कृषी विभागाने नुकसानीचा सर्वे करुन भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# पैशासाठी विवहितेचा छळ; पाच जणांवर गुन्हा दाखल

**खामगाव/प्रतिनिधी**

माहेरवरून पैसे व सोन्याचे मंगळसूत्र आणण्यासाठी तगादा लावीत विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी शिवाजी नगर पोलिसांनी सासरच्या पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खामगाव एमआयडीसी परिसरातील गौरानगर माहेर असलेल्या सुषमा राहुल बंबटकार या विवाहितेने शिवाजी नगर पोस्टे. ला फिर्याद दिली की, त्यांचा विवाह जळगाव जामोद येथील राहुल समाधान बंबटकार याच्याशी झाला. विवाहानंतर २५ मे २०२२ ते ८ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत सासरी नांदावयास गेली. सुरुवातीचे काही दिवस चांगले वागविल्यानंतर सासरच्या मंडळीने सोन्याची पोत व पैशासाठी शारिरीक व मानसिक छळ सुरू केल्याने दोन लाख रुपये आणून दिले. मात्र, त्यानंतरही सासरच्या मंडळीच्या वागणुकीत बदल झाला नाही. पैसे व सोन्यासाठी छळ सुरूच ठेवित पैसे व सोने मिळत नाही, तोपर्यंत वागविणार नाही, अशी धमकी दिल्याच्या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती राहुल समाधान बंबटकार, सासरा समाधान शंकर बंबटकार, सासू सविता समाधान बंबटकार तिघेही रा. माळीखेल ज.जामोद, नणंद वंदना नीलेश इंगळे व नंदोई नीलेश शालिग्राम इंगळे दोघेही रा. निवारा कॉलनी अकोला यांच्यावर भादंवीचे कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# कारच्या धडकेत डॉक्टर पुत्रासह आईचा मृत्यू; वडील गंभीर

**खामगाव/प्रतिनिधी**

नववधूच्या घरी होळीचा सण देऊन परतीच्या वाटेवर असलेल्या अकोला जिल्ह्यातील बाळापूर येथील माळोदे कुटुंबावर काळाने झडप घातली. अज्ञात वाहनाच्या धडकेत कारमधील डॉक्टर पुत्रासह आईचा जागीच मृत्यू झाला तर वडील गंभीर जखमी झाल्याची घटना खामगाव बाळापूर मार्गावरील हॉटेल सुदर्शन ढाब्याजवळ रविवार ३१ मार्च रोजी सायंकाळी सात वाजे दरम्यान घडली.

बाळापूर येथील रहिवासी रामराव लक्ष्मण माळोदे यांचा मुलगा दंत शैल्य चिकित्सक डॉ. निलेश रामराव माळोदे (वय २७) याचा विवाह इंदोर येथील एका मुलीशी ठरला होता. सदर नववधूला होळीचा सण देण्याकरिता रामराव लक्ष्मण माळोदे, डॉ. निलेश रामराव माळोदे व सौ. संगीता रामराव माळोदे हे तिघे कार क्रमांक एम एच ३० बीबी ५५८२ ने इंदोर येथे कार्यक्रम आटपून रविवार ३१ मार्चच्या सायंकाळी परत बाळापूर येथे येत असताना गावाच्या वेशीवर पोहोचताच त्यांच्या कारवर काळाने घाला घालीत अकोला कडून खामगावच्या दिशेने येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या कार्याला समोरून धडक दिली. या धडकेत कार तीन ते चार वेळा पलटी होवून रस्त्याच्या कडेला जाऊन कोसळली. या अपघातात डॉ. निलेश माळोदे व त्याची आई संगीता माळोदे यांचा जागीच मृत्यू झाला तर वडील रामराव माळोदे हे गंभीर स्वरूपाने जखमी झाले. त्यांना नागरिकांनी तातडीने खामगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचारात दाखल केले आहे. वृत्त येईपर्यंत पोलिसांची कार्यवाही सुरु होती.

**वीस दिवसानंतर होते निलेशचे लग्न**

*डॉ.निलेश रामराव माळोदे यांचा येत्या २० एप्रिल रोजी विवाह ठरला होता. त्यांच्या विवाहाची जवळपास सर्व तयारी झालेली होती. नातेवाईकांना निमंत्रण सुद्धा पाठविण्यात आले होते. परंतु लग्नाआधीच त्यांच्यावर काळाने अचानक घाला घातल्याने माळोदे कुटुंबीयांवर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे.*

# भुसावळ - नागपूर मार्गावरील तीन गाड्यांना मुदतवाढ



**मलकापूर/प्रतिनिधी**

प्रवाशांची मागणी पाहता रेल्वे प्रशासनाने या महिन्याच्या शेवटी बंद होणाऱ्या भुसावळ-नागपूर या मार्गावरील तीन्ही गाड्यांना तीन महिन्यांसाठी मुदतवाढ दिली आहे. ही माहिती जिल्हा प्रवासी संघाचे अध्यक्ष ॲड. महेंद्र बुरड व तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष पारसमल झाबक यांनी दिली आहे.

गाडी क्रमांक ०१२११ बडनेरा- नाशिक मेमू, तसेच गाडी क्रमांक ०१२१२ नाशिक- बडनेरा, गाडी क्रमांक ०११३९ नागपूर- मडगाव व गाडी क्रमांक ०११४० मडगाव (गोवा)- नागपूर तसेच लांब पल्ल्याची ०७११५-०७११६ जयपूर- हैदराबाद या गाड्यांचा विस्तार तीन महिने म्हणजे जून महिन्यापर्यंत वाढविला आहे. यामुळे लग्नसराई, उन्हाळ्याच्या सुट्टया आदींमध्ये प्रवाशांना प्रवास करणे सोयीचे होणार आहे.

स्थानिक गुन्हा शाखेची जिल्ह्यात मोठी कारवाई..

# मलकापूर व चिखली येथून जप्त केला ३४.२० लाखाचा बायोडीजल साठा

**बुलढाणा/ प्रतिनिधी**

आगामी लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हा शाखेने ॲक्शन मोडवर येत ३० मार्च रोजी चिखली व मलकापूर तालुक्यात अवैध बायोडीजल विक्री करणाऱ्या नऊ जणांवर धडक कारवाई करीत त्यांच्याकडून ३१४०५ बायोडीजलसह ३४ लक्ष २० हजार २९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांच्या कारवाईने अवैध बायोडीजल विक्री करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

स्थानिक गुन्हा शाखा पथकाने विशेष मोहिम राबवित चिखली तालुक्यातील किसान बायो डीजल येथे धाड टाकून ७००० हजार बायोडीजल ५ लक्ष ४ हजार व इतर मुद्देमाल असा एकूण ७ लक्ष १५ हजाराचा मुद्देमाल जप्त करुन सचिन रामकृष्ण लोखंडे यांच्यावर कारवाई केली.

काठोडे ट्रेडर्स चिखली येथून ज्ञानेश्वर सारजुबा काठोळे रा.खैरव ता.चिखली यांच्या ताब्यातून २४०० लिटर बायोडीजल १ लक्ष ९२ रुपये व इतर असा ३ लक्ष ९२ हजार, मलकापूर तालुक्यात ग्रामीण हद्दीत कारवाई करीत हॉटेल न्यू सहयोग लगत, नॅशनल हायवे धानोरा शिवार येथे नफीस खान नासीर खान वडनेर भोलजी यांच्याकडून १५ हजार बायोडीजल १२ लक्ष ७५ हजार व इतर असा १५ लक्ष ५ हजार ५० रुपये, मलकापूर एमआयडीसी हद्दीत हॉटेल निसर्गच्या येथे कारवाई करीत हेमंत ज्ञानेश्वर काचकुरे रा.तालसवाडा व परमेश्वर कैलास वनारे रा.माकनेर यांच्याकडून ४४५ लिटर बायोडीजल ३३ हजार ३७५ रुपये व इतर १ लक्ष ६२ हजार २७५ रुपये, दसरखेड येथील पदमनी प्रभाकर महाराज यांच्या शेतात कारवाई करीत शेख जावेद शेख सलीम व शेख जायेब शेख रशीद दोन्ही रा.मलकापूर यांच्याकडून १६१० लिटर बायोडीजल १ लक्ष २० हजार ७५० रुपये व इतर साहित्य असा ३ लक्ष ६७ हजार ३५० रुपये, हॉटेल अमन दसरखेड येथे मो.जिया मो.युसूफ व गुरफान खान गफार खान दोन्ही मलकापूर यांच्याकडून २९५० लिटर बायोडीजल किंमत २ लक्ष ६०० रुपये व इतर असा २ लक्ष ७५ हजार ३२० रुपये असा एकूण ३४ लक्ष २० हजार २९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उपरोक्त नऊ आरोपींवर चिखली व मलकापूर ग्रामीण पोलिसांत भादंवीचे कलम २८५ सह ३, ७ ईसी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे.



**यांनी केली कारवाई**

*जिल्हा पोलिस अधिक्षक सुनिल कडासणे, अपर पोलिस अधिक्षक अशोक थोरात, बी.बी.महामुनी यांच्या मार्गदर्शनात स्थागुशा पोलिस निरिक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात स्थागुशा सपोनी. विलासकुमार सानप, आशिष चवरे, पारपत्र विभागाचे श्रीधर घट्टे, पोउपनी.श्रीकांत जिंदवामर, सचिन कानडे, रवी मोरे व गुन्हे शाखा बुलढाणा यांच्या पथकाने केली.*

# मोताळ्यात आजपासून अतिक्रमण हटाव मोहिम!

**पंचायत समितीसमोरील अतिक्रमणावर चालणार बुलडोजर**

**मोताळा/प्रतिनिधी**




लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मारकाच्या सौंदर्यीकरणासाठी नगर पंचायत हद्दीमध्ये शासनस्तरावरुन विकास कामांना मंजुरी देण्यात आली आहे. परंतु पंचायत समिती समोरील अतिक्रमणामुळे विकास कामांना अडथळा निर्माण झाल्याने न.पं.प्रशासनाने अतिक्रमण धारकांना नोटीशी बजावून ३१ मार्चपर्यंत अतिक्रमण काढण्याचा अल्टीमेटम दिला असून सोमवार १ एप्रिलपासून अतिक्रमणावर बुलडोजर चालणार आहे.

मोताळा शहराचा पाहिजे त्या प्रमाणात विकास झालेला नाही. शहरात मोठे उद्योगधंदे किंवा युवकांना रोजगार उपलब्ध नसल्याने नांदुरा रोडवरवर पंचायत समिती आवारासमोर २० ते २५ युवकांनी छोटे-मोठे गॅरेज, बुट हाऊस, चटोरी चॉट, गॅरेज आदी दुकाने थाटली आहेत. या अतिक्रमणामुळे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे स्मारकाचे सौंदर्यीकरण करणे व विकास कामांना अडथळा निर्माण झाल्याने अतिक्रमण धारकांना नोटीस देवून ३१ मार्चपर्यंत अतिक्रमण काढण्याचा अल्टीमेटम देण्यात आला असून सोमवार १ एप्रिलपासून अतिक्रमणावर बुलडोजर चालणार असल्याने ७० टक्के अतिक्रमण धारकांनी स्वयंस्फुर्तीने अतिक्रमण काढून न.पं. प्रशासनाला सहकार्य केले आहे. अतिक्रमण धारकांची इतरत्र व्यवस्था करण्यात आली नसल्यामुळे त्यांच्यावर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणार असल्याने अतिक्रमण धारकांनी तीव्र रोष व्यक केला आहे.




# अभिनेता सनी देओलचे तिकीट भाजपने कापले



**नवी दिल्ली :** भाजपने लोकसभा निवडणुकीसाठी शनिवारी आपल्या उमेदवारांची आठवी यादी जाहीर केली. या यादीत ३ राज्यांतील ११ उमेदवारांची नावे आहेत. पंजाबातील गुरुदासपुरातून अभिनेता सनी देओल यांचे तिकीट कापण्यात आले आहे.

सनी देओलऐवजी गुरुदासपुरातून यावेळी दिनेशसिंह बब्बू यांना उमेदवारी देण्यात आली आहे. बिजू जनता दलातून भाजपमध्ये दाखल झालेल्या भर्तृहरी मेहताब यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. मेहताब यांच्यासह ओडिशातून ३, पंजाबातून ६ आणि पश्चिम बंगालमधून २ उमेदवारांच्या नावांची घोषणा झाली आहे. ओडिशातील जाजपूर, कंधहाल, कटक येथून अनुक्रमे रवींद्र बेहरा, सुकांत पाणीग्रही आणि भतृहरी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या तिन्ही मतदारसंघांतील विद्यमान खासदारांची तिकिटे कापण्यात आली आहेत. आठव्या यादीसह भाजपने आजअखेर ४१७ उमेदवारांची घोषणा केली आहे.

पंजाबातील जालंधरहून सुशील रिंकू, लुधियानाहून रवनीतसिंह बिट्टू, पतियाळाहून परनीत कौर, फरिदकोटहून हंसराज हंस हे उमेदवार असतील. अमृतसरहून अमेरिकेतील भारताचे माजी राजदूत तरणजितसिंह संधू यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# 'क्रू' दोन दिवसांत १८ कोटींच्या घरात



**मुंबई :** अनेक वर्षांनी तीन बड्या अभिनेत्री एकत्र असलेला एक नायिकाप्रधान चित्रपट आला आहे. तब्बू, करिना कपूर व क्रिती सेनॉन या अभिनेत्री मुख्य भूमिकेत असलेला 'क्रू' चित्रपट शुक्रवारी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाने ग्रँड ओपनिंग केली आहे. या चित्रपटाने पहिल्या दिवशी जबरदस्त कमाई केली. तर दुसऱ्या दिवशीही या चित्रपटाने भरघोष अशी कामगिरी केली आहे.

'क्रू'ने शुक्रवारी पहिल्या दिवशी भारतात ८.७५ कोटी रुपये कमावले आहेत, तर जगभरात या चित्रपटाने २०.०७ कोटी रुपयांची कमाई केली आहे. शनिवारी रोजी देशात बॉक्स ऑफिसवर ९.६ कोटींचा गल्ला जमवला आहे. पहिल्या आणि दुसऱ्या दिवशीच्या कमाईचे एकूण कलेक्शन १८. ८५ कोटीवर पोहोचले आहे. जगभरात या चित्रपटाने ८ कोटी रुपयांची कमाई करत एकूण २८ कोटींच्या घरात पोहोचली आहे. तसेच वीकेंडचा रविवार आणि सुट्ट्या असल्याने या चित्रपटाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

'क्रू'चे दिग्दर्शन राजेश कृष्णन यांनी केले आहे आणि त्यात कपिल शर्मा, दिलजित दोसांझ, सास्वता चॅटर्जी आणि राजेश शर्मा यांच्याही भूमिका आहेत. हा विनोदी चित्रपट पहिल्या दिवशी चांगली कमाई करण्यात यशस्वी ठरला आहे. चित्रपटाची बॉक्स ऑफिसवर अजय देवगणच्या 'शैतान'शी टक्कर होत आहे; पण या चित्रपटाला तीन आठवडे झाले आहेत. याशिवाय दुसरा कोणताही मोठा चित्रपट प्रदर्शित झालेला नाही, त्याचा फायदा या चित्रपटाला मिळू शकतो.

# हार्दिक पंड्याची खिल्ली उडवल्यास होणार थेट पोलीस कारवाई!

**मुंबई, वृत्तसंस्था :**



इंडियन प्रिमिअर लीगच्या यंदाच्या पर्वातील मुंबईतील पहिला सामना १ एप्रिल रोजी वानखेडे स्टेडियममध्ये खेळवला जाणार आहे. राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या या सामन्यासाठी मुंबई इंडियन्सचा संघ काही दिवसांपूर्वीच शहरात दाखल झाला असून जोरदार सराव सुरु आहे. मात्र असं असतानाच दुसरीकडे रोहित शर्मा कर्णधारपदावरुन पायउतार झाल्यानंतरचा हा मुंबईतील पहिलाच समाना असल्याने नवनिर्वाचित कर्णधार हार्दिक पंड्याची हुर्यो उडवली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पंड्याला मुंबईकर क्रिकेट चाहत्यांकडून विरोध सहन करावा लागू शकतो असा अंदाज आहे. आतापर्यंत आयपीएलमध्ये झालेल्या मुंबईच्या दोन्ही सामन्यांमध्ये हेच चित्र पाहायला मिळालं. मात्र वानखेडेच्या मैदानात पंड्याची खिल्ली उडवणं क्रिकेट चाहत्यांना महागात पडू शकतं असं चित्र दिसत आहे.

**मुंबईतील मॅचआधी निर्णय**

तसेच वानखेडेमध्ये होणाऱ्या मुंबईच्या संघाच्या चारही सामन्यांना येणाऱ्या प्रेक्षकांवर पोलिसांची बारीक नजर असणार आहे. पंड्याला चिडवणाऱ्या, डिवचणाऱ्या किंवा त्याच्याविरुद्ध अयोग्य शब्दप्रयोग करताना आढळून आल्यास अशा क्रिकेट चाहत्यांविरोधात एमसीएकडून कारवाई केली जाईल किंवा अशा हुल्डबाज प्रेक्षकांना मैदानातून बाहेर काढलं जाईल. मात्र अशा हुल्लडबाज प्रेक्षकांवर लक्ष ठेऊन त्यांच्यावर सामना सुरु असताना कारवाई करणं पोलिसांसाठी आव्हानात्मक ठरु शकतं.

रोहितने मुंबई इंडियन्सचं कर्णधारपद सोडल्यानंतर १ एप्रिल रोजी होणारा मुंबईचा सामना हा होम ग्राऊण्डवरील पहिला सामना ठरणार आहे. त्यामुळे या सामन्यात रोहित तसेच मुंबईच्या चाहत्यांकडून हार्दिकविरुद्ध घोषणाबाजी, पोस्टरबाजी होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. पहिल्या दोन्ही सामन्यांमध्ये रोहितच मुंबईचा खरा कर्णधार आहे, रोहितच आमच्यासाठी आजही कर्णधार आहे असा अर्थाचे पोस्टर्स मैदानात झळकल्याचं पाहायला मिळालं होतं.

## पहिल्या दोन्ही सामन्यांमध्ये उडवण्यात आली खिल्ली

*आयपीएल सुरु होण्याच्या काही महिने आधी प्लेअर्स ट्रेडमध्ये मुंबईच्या इंडियन्सच्या व्यवस्थापनाने हार्दिकला पुन्हा संघात स्थान देण्याचा निर्णय घेत गुजरात टायटन्सकडून त्याला विकत घेतलं. त्यानंतर काही आठवड्यांमध्ये मागील १० वर्षांपासून नेतृत्व करणाऱ्या आणि ५ वेळा आयपीएल जिंकवून देणाऱ्या रोहित शर्माऐवजी हार्दिक पंड्याकडे कर्णधारपद सोपवलं. मात्र मुंबईच्या संघाचा हा निर्णय चाहत्यांना आवडला नाही. सोशल मीडियापासून ते अगदी आता आयपीएल सुरु झाल्यानंतर मैदानातही पंड्याविरुद्धचा रोष दिसून येत आहे. गुजरातविरुद्धच्या यंदाच्या पर्वातील मुंबईच्या पहिल्याच सामन्यात टॉसच्या वेळी अहमदाबादच्या मैदानात चाहत्यांनी पंड्याची खिल्ली उडवली. असाच प्रकार सनरायझर्स हैदराबादच्या सामन्यापूर्वीही हैदराबादच्या मैदानात पाहायला मिळाला.*

## मुंबई क्रिकेट असोसिएशनने घेतला मोठा निर्णय

*याच पार्श्वभूमीवर आता पुढील ४ सामने वानखेडेमध्ये होणार असल्याने पंड्याला चाहत्यांकडून पुन्हा टार्गेट केलं जाण्याची दाट शक्यता आहे. म्हणूनच थेट मुंबई क्रिकेट असोसिएशनने मैदानात पंड्याला चाहत्यांकडून त्रास दिला जाण्याची शक्यता असल्याने काही कठोर निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमुळे पंड्याची टर उडवणाऱ्या मुंबईकर क्रिकेट चाहत्यांच्या अडचणी वाढू शकतात असं सध्या दिसत आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनने हार्दिकविरुद्ध घोषणाबाजी होऊ वानखेडेमधील सामन्यात गोंधळ होऊ शकतो या शक्यतेच्या आधारावर मैदानातील सुरक्षेत वाढ केली आहे.*

# रोहितची मस्करी केल्याने चेन्नईच्या क्रिकेट चाहत्याचा मारहाणीत मृत्यू

**शिगणापूर, वृत्तसंस्था :**

आयपीएलमध्ये रोहित शर्मा आऊट झाल्यानंतर आनंद व्यक्त करणाऱ्या चेन्नईच्या चाहत्याचा मुंबईच्या दोन चाहत्यांनी केलेल्या मारहाणीत मृत्यू झाला. करवीर तालुक्यातील हणमंतवाडी येथे बुधवारी रात्री टीव्हीवरील आयपीएल क्रिकेट सामना बघताना चेष्टा मस्करीतून झालेल्या भांडणातून मारहाणीची घटना घडली होती. यात गंभीर जखमी झालेल्या बंडोपंत बापू तिबिले (वय ६७) यांचा शनिवारी रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला.

हणमंतवाडीत शिवाजी गायकवाड यांच्या घरी बुधवारी रात्री दहाच्या दरम्यान आयपीएल क्रिकेटचा सामना गल्लीतील लोक बघत असताना बंडू तीबिले व बळी महादेव झांजगे यांच्यात चेष्टा मस्करी सुरू झाली. त्याचे रूपांतर बाहेर आल्यानंतर भांडणात झाले. बळी झांजगे व त्यांचा पुतण्या सागर सदाशिव झांजगे यांनी केलेल्या मारहाणीत बंडोपंत तिबिले गंभीर जखमी झाले होते.

त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. गेले तीन दिवस उपचार सुरू होते. त्यांच्या कान व नाकातून रक्तप्रवाह थांबत नव्हता. शनिवारी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, मुलगा, नातवंडे असा परिवार आहे. गावात अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवला आहे.

# बाबर आझम पुन्हा पाकिस्तानचा कर्णधार!


## क्रिकेट बोर्डाने केली अधिकृत घोषणा

**लाहोर, वृत्तसंस्था :**



पाकिस्तान क्रिकेट संघाने अखेर बहुचर्चित प्रश्नांना पूर्णविराम लावत बाबर आझमची पुन्हा एकदा कर्णधार म्हणून नियुक्ती केली. निर्धारित षटकांचे क्रिकेट म्हणजे टी आणि वनडे संघासाठी बाबर आझम पाकिस्तान क्रिकेट संघाचा कर्णधार असेल असे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आपल्या ट्विटरद्वारे स्पष्ट केले. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची निवड समिती आणि पीसीबी चेअरमन मोहसीन नक्वी यांनी एकमताने बाबर आझमची पुन्हा एकदा कर्णधार म्हणून निवड केल्याचे ट्विटमधून सांगण्यात आले. आगामी टी-२० वर्ल्ड कप २०२४ च्या हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.

पाकिस्तानच्या टी संघाचा कर्णधार शाहीन शाह आफ्रिदी होता. पण, त्याला कर्णधारपदावरून हटवण्यात आल्याचे समजताच त्याने पद सोडले. त्यानंतर बाबरला पुन्हा नेतृत्वाची संधी देण्यात आली आहे. शाहीन आफ्रिदी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्यावर नाराज होता. नक्वी आणि निवडकर्त्यांनी आफ्रिदीशी चर्चा न करता त्याला कर्णधारपदावरून काढण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले गेले. शाहीनच्या नेतृत्वात पाकिस्तानने केवळ एक टी मालिका खेळली. त्यातही त्यांचा ४-१ असा पराभव झाला. त्यामुळे त्याला पदावरून हटवण्यात आले असल्याची चर्चा आहे. शाहीन आफ्रिदी कर्णधारपद सोडण्यास तयार होताच. पण बोर्डाकडून याबद्दल कोणतीही सूचना मिळाली नसल्याचे त्याने सांगितले होते. माजी कर्णधार बाबर आझमवर आता पुन्हा एकदा ही जबाबदारी सोपवली आहे. या यादीत बाबर सोबतच मो.रिझवानने नाव शर्यतीत होते. भारतात पार पडलेल्या वन डे विश्वचषकानंतर बाबरला कर्णधारपद सोडण्यास भाग पाडले गेले होते.



## दैनिक महाभूमि शब्दसंगम 229

**—: आडवी विधाने:—**

1) मरणोन्मुख, मरायला टेकलेला
3) गावाची व्यवस्था पाहणारी सभा
8) जंगल
10) बर्फ
11) सामुहिकरित्या एखाद्या विषयाविरुद्ध केलेली निषेधाची कृती
12) तरचा सोबती
13) क्षणिक चमकणारी वीज, विद्युल्लता
16) चाकर, नोकर
17) अंगठ्याजवळचे हाताचे बोट
18) रुग्णालयात मृतदेह ठेवण्याची खोली
19) मंत्रोपचाराद्वारे देवाच्या मूर्तीच्या अवयवांवर देवत्वाची स्थापना करणे
21) एक संख्या
23) दोन मल्लांमध्ये खेळले जाणारे मल्लयुद्ध
24) मजबुत, कणखर
26) मंडलाकार भ्रमण पावणारा मोठा वारा
27) शिव पत्नी
28) संपूर्ण, सगळे
30) चोप, ताडन
31) फिरणे, भरकटणे, प्रवास
32) अयशस्वी
34) एकच गोष्ट वारंवार म्हणणे
36) वडिलांचा भाऊ
37) नदीच्या धरणातील वाहून नेण्यात येणारा पाट
39) विवाहविधीत लाह्यांच्या होमाचा विधी
41) बळकट, कणखर
43) खरे, न्यायाचे
44) हाताखालचा आज्ञा पाळणारा माणूस
46) निपूण, पटाईत
48) एक श्वास रोग
49) दुर्दशा, वाईट स्थिती, फरफटत जाणे
50) आंकडा , नाटकाचा एक भाग
51) विश्रांती, निवड, आराम
53) पर्वतावर चढणे
55) इच्छित वस्तुंची पूर्तता करणारा एक कल्पित वृक्ष
56) पत, प्रतिष्ठा
58) समाजात असलेला एखाद्याचा आदर
59) केळांचा समुदाय
60) जमीन
61) लेखणी, कायद्यातील बाब
62) मुसलमानांचा सण
64) एक पक्षी, बक
66) या बाजूपासून त्या बाजूपर्यंत
68) आठ (सं.)
69) अस्वस्थ वाटणे, व्याकूळ होणे
71) श्रीकृष्णाचे एक संबोधन
72) पारद
73) आग, विस्तव
74) अर्धा भाग, सैन्य
75) पैज
76) शिकार, सावज
77) तलम सुताचे मऊ कापड
78) नांगरलेली जमीन साफ करण्याचे यंत्र
79) आपली कला सादर करणारा

**—: उभी विधाने:—**

1) राखून ठेवणे, रिझर्वेशन
2) मनातील भाव
3) गावातील शासकीय कनिष्ठ सेवा अधिकारी
4) प्रातःस्मरणात उल्लेखित अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी या पाच पतिव्रता
5) पैंजण, विशेषतः मुंबईला आढळणारी एका नमुन्याची घरे
6) हाताच्या बोटावर असलेले लहान चिन्ह, जव
7) अतिशय क्रोध, संताप
8) राजकारण, राज्य व्यवहार शास्त्र
9) मनुष्य
14) प्रशंसा, स्तुती, गुणगान
15) वजनदार, महत्वाचे
20) सौभाग्यवती स्त्री
22) घोड्यावर स्वार झालेला
23) जिचे लग्न झालेले नाही अशी मुलगी
25) फळाची साल
27) ऋणभार, मेहेरबानी
28) सारखे
29) पाठीच्या हाडांची गांठ
30) नशा आणणारे, कैफी
32) जे वास्तवात नाही असे, अयोग्य
33) लाज, शरम
34) क्षुल्लक, नीच
35) हार, पराभव
38) पाण्यावरील तरंग, लाट
40) प्रत्येक कार्यात अग्रेसर असलेला, पुढे उत्कर्ष पावेल असे वाटण्याजोगा तरुण
42) पैसा
43) कुठल्याही कार्याचा शेवट, सांगता
45) टणक, निबर
47) ज्याला काहीच चव नाही असे, रुचिहीन
48) सागर, समुद्र
49) पैज, परंतु
50) लग्नात वधु वरांमध्ये आडवे धरलेले वस्त्र
52) विशेष, कौतुक, उल्लेखनीय गोष्ट
53) खरेदीदार, माल खरेदी करणारा
54) ताकद नष्ट झालेला, दुर्बळ
57) पुराण कालीन एक अत्यंत तापट ऋषी
59) वर्गातील काळ्या रंगाचा मोठा तक्ता, यावर खडूने लिहिले जाते
61) परिश्रम, मेहनत
63) चिखलाची किंवा पाणथळ जमीन
65) श्रीगजानन
66) हातमागावर विणतांना आडवी सुते दाबुन बसविण्याची योजना
67) शुष्कता, भकभक, रुक्षता
68) शासनकर्त्याची जनतेवरची जरब संपल्यावर होणारी राज्याची स्थिती
70) जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध
71) झुकलेला, नम्र झालेला
72) एक चतुर्थांश, ब्रेड
73) कुबेरपुरीचे राजा कुबेराची राजधानी

**मागील महाशब्दव्यूहचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मा | ल | वू | न | टा | क | दी | प | चे | त | वू | न | अं | ग | अं | ग |
| र्ग | | | ज | प | त | प | | | पा | | र | | र | ग | ड |
| प | त्र | का | र | | | | का | न | स | | मा | | म | र | |
| रि | | | चू | क | भू | ल | | मा | | पा | ई | क | | खा | स |
| व | ज्र | सं | क | ल्प | | | मा | ज | घ | र | | मा | त्रा | | मी |
| ह | | ग | | त | रु | त | ल | | रो | ख | पा | ल | | मा | प |
| न | वी | न | | रु | प | व | ती | | बा | | ता | | मे | घ | |
| | त | म | स | | ग | | | स | | सा | ळ | सू | द | | ह |
| कि | रा | त | | च | र्वि | त | च | र्व | ण | | यं | त्र | | प | र |
| मा | ग | | ह | र | ता | ळ | | गु | | का | त्री | | अ | ट | क |
| न | | न | | | | कों | क | ण | स्थ | | | सं | धि | वा | त |
| प | ट | को | ड | गा | | क | | सं | प | र्क | अ | धि | का | री | |
| क्षी | र | सा | ग | र | | ण | | प | ति | | सं | ग | र | | ना |
| | | | म | वा | ळ | | सु | न्न | | नौ | ब | त | | या | ग |
| त | ग | म | ग | | | ना | का | | सं | ब | द्ध | | ना | द | |
| म | र | ण | | वा | व | ट | ळ | | ग | ती | | के | श | व | |

uday munde - 8446302691

# चिराग-सात्विक साईराजकडून सायनाचा विक्रम मोडीत

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

विश्व बॅडमिंटन फेडरेशनच्या मानांकन यादीत अग्रस्थानावर सर्वाधिक कालावधी राहण्याचा भारताच्या सायना नेहवालचा विक्रम चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज यांनी मोडीत काढला आहे.

भारताचे पुरूष बॅडमिंटनपटू चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रेनकिरो यांनी गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धांमध्ये आपल्या कामगिरीत सातत्य राखले आहे. चिराग आणि सात्विकसाईराज यांनी पुरूष दुहेरीच्या मानांकन यादीत अग्रस्थान मिळविले असून या जोडीने २०२४ च्या बॅडमिंटन हंगामात आपले वर्चस्व या मानांकन यादीत ठेवले आहे. यापूर्वी भारताची महिला बॅडमिंटनपटू सायना नेहवालने महिला एकेरीच्या मानांकन यादीत सुमारे १० आठवडे आपले अग्रस्थान राखण्याचा विक्रम केला होता. १८ ऑगस्ट २०१५ साली ते २१ ऑक्टोबर २०१५ पर्यंत सायनाने महिला एकेरीच्या मानांकन यादीत पहिले स्थान टिकविले होते. आता सायनाचा हा विक्रम चिराग आणि सात्विकसाईराज यांनी मोडीत काढला आहे.

चिराग आणि सात्विकसाईराज यांनी पुरूष दुहेरीच्या मानांकन यादीत १, ०२, ३०३ मानांकन गुणासह पहिले स्थान मिळविले आहे. या यादीत दक्षिण कोरियाचे हेयुक आणि जेई हे दुसऱ्या स्थानावर आहेत. पण त्यांच्या मानांकन गुणात ५ हजार गुणांचा फरक आहे. चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज या जोडीने आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरूष दुहेरीचे जेतेपद मिळवून मानांकनात अग्रस्थान काबिज केले होते. त्यानंतर या जोडीने चीन खुल्या, मलेशिया खुल्या, इंडिया खुल्या या स्पर्धेत अंतिम फेरी गाठली

दैनिक महाभूमि निर्मल, निकोप, निःपक्ष

बुलढाणा शहरात अंकासाठी संपर्क

लक्ष्मी न्युज पेपर एजन्सी, बुलढाणा

7262909192


## दखल...

### ..व्वा क्या सीन है?

काय ते देशाचे राजकारण<br>
काय त्या कोलांटउड्या खाणं<br>
काय ते काका पुतन्याचं प्रेम<br>
काय ते पलटवार ..!

काय ते दलबदलू<br>
कायते आरोप प्रत्यारोप<br>
काय ती हातमिळवणी<br>
काय ते घराणेशाही पुराण ..<br>
सारं कसं छान<br>
आहे देशाची शान<br>
सत्ता टिकविण्यासाठी<br>
हे सारे द्रविड्री प्राणायाम . .

– प्रा.अशोक सारडा, मेहकर<br>
(९४२१३९४३३९)

## थोडक्यात

### वन्य प्राण्यांची पाण्यासाठी भटकंती

**बुलढाणा:** वन विभाग परिसरातील वन्य प्राण्यांच्या अधिवासात पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक तेव्हढे पाणवठे नसल्याने वन्य प्राण्यांची भटकंती वाढली असून वन्य प्राणी पाण्याच्या शोधार्थ मानवी वस्तीकडे धाव घेत आहेत. त्यामुळे वन विभागाने वन्य प्राण्यांच्या अधिवासात त्यांच्या पाण्याची व्यवस्था करावी अशी मागणी होत आहे. गेल्या काही दिवसात वन्य प्राण्यांचा मानवी वस्तीत वावरच्या घटना पुढे आल्या आहेत.

### मोरे यांना 'समाज भूषण' पुरस्कार जाहीर

**मलकापूर :** मलकापूर : १९७व्या ज्योतीबा फुले व १३३ वा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती उत्सव 'समतेचे निळे वादळ'आणि भीम युवक सांस्कृतिक व शैक्षणिक क्रीडा मंडळ मलकापूर यांचे संयुक्त विद्यमाने साजरी होत आहे. एल.सी.मोरे यांना समाज भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. समाजामध्ये ज्यांनी आदर्शवत कामगिरी केली. समाजाची आणि देशाची सीमेवर राहून सेवा करीत समाजासमोर नवीन आदर्श प्रस्थापित केला आहे.

### माजी आ.हर्षवर्धन सपकाळ यांचे ट्विट; राहुल बोंद्रे मेळाव्यासाठी पोचले उशिरा

# महाविकास आघाडीत बिघाडीचे संकेत

गणेश निकम केळवदकर

**बुलढाणा :** बुलढाणा विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय गायकवाड यांनी लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची घोषणा करून एकच खळबळ उडून दिली होती. त्या पाठोपाठ आता काँग्रेसचे माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांनीही 'एक्स'वर व्टिट करून राज्यातील इतर मतदार संघाप्रमाणे बुलढाणा मतदार संघातही मैत्रीपूर्ण लढतीचे संकेत दिल्याने महाविकास आघाडीच्या गोटात खळबळ उडवून दिली आहे. महाविकास आघाडीकडून उबाठा सेनेचे प्रा. नरेंद्र खेडेकरांना उमेदवारी दिलेली असताना सपकाळांनी असे व्टिट करणे म्हणजे नक्कीच दाल मे कुछ




काला असल्याचे बोलले जात आहे.

एकीकडे महायुतीमध्ये लोकसभा उमेदवाराच्या विरोधात नाराजी व्यक्त होत असताना तिकडेही तोच सूर गिरवल्या जात आहे.महाविकास आघाडीत बुलढाणा लोकसभेसाठी जागा काँग्रेसला सोडण्यात यावी अशी मागणी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या पक्ष श्रेष्ठींकडे केली होती.मात्र आता ही जागा उद्धव ठाकरे गटाला सोडण्यात आली आहे. त्यांनी प्रा.खेडेकर हे अधिकृत उमेदवार असल्याचे देखील जाहीर केले. असे असताना सपकाळांनी मैत्रीपूर्ण लढतीचे दिलेले संकेतासह ते बुलढाणा लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज देखील भरणार असल्याचे बोलले जात आहे.या बाबत विचारणा करण्यासाठी त्यांना संपर्क केला असता हर्षवर्धन सपकाळ हे नॉट रिचेबल मिळाले. त्यामुळे महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची चिन्हे निर्माण झाली असून, त्यांची समजूत काढण्यासाठी महा विकास आघाडीचे प्रमुख नेते कितपत यशस्वी होतात हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

### नाराजांची समजूत काढण्यासाठी स्वतः पोहचले उमेदवार

*बुलढाण्यात ३१ मार्चला महाविकास आघाडीचा पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. मात्र काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे आणि त्यांचे इतर सहकारी हे मेळाव्याच्या ठिकाणी न जाता गांधी भवन मध्येच थांबले.यामुळे महा विकास आघाडीचे उमेदवार नरेंद्र खेडेकर हे स्वतः व आमदार नितीन देशमुख यांनी गांधी भवन मध्ये येऊन काँग्रेस पदाधिकाऱ्यांची समजूत काढत त्यांची मनधरणी केली अशी सूत्रांची माहिती आहे. त्यानंतर काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मेळाव्याला गेले. त्यामुळे महा विकास आघाडीत सर्व काही आलबेल नसल्याचं बोललं जात आहे.*

## महाविकास आघाडी कार्यकर्ता व पदाधिकारी मेळावा

**चिखली :** महाविकास आघाडीतर्फे शिवसेना उबाठाचे प्रा. नरेंद्र खेडेकर यांना बुलडाणा लोकसभा मतदार संघाची उमेदवारी निश्चित झाली. त्यांच्या प्रचारार्थ ३१ मार्च रोजी मौनीबाबा संस्थान येथे चिखली विधानसभेतील महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा संपन्न झाला. या मेळाव्याला बुलढाणा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष माजी आ राहुल बोंद्रे, अमरावती पदवीधर मतदार संघाचे आ धिरज लिंगाडे, बाळापूर विधानसभा मतदार संघाचे आ. नितीन बापु देशमुख, श्याम उमाळकर, प्रसेनजित पाटील, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, ॲड साहेबराव सरदार, विष्णु पाटील कुळसुंदर यांनी मार्गदर्शन केले. सर्व मान्यवरांनी प्रा.खेडेकर यांना लोकसभेत पाठविण्यासाठी एकजुटीने कामाला लागण्याचे आवाहन केले. मेळाव्याला चिखली विधानसभा व जिल्ह्यातील महाविकास व मित्रपक्षाचे तसेच महिला आघाडीचे सर्व मान्यवर, जिल्हाध्यक्ष, उप जिल्हाध्यक्ष, तालुका प्रमुख, शहर प्रमुख, उप तालुका प्रमुख, विभाग प्रमुख, शाखा प्रमुख यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## चिखलीत ३१ मे रोजी सर्वजातीय सामूहिक सोहळा

कोलारा / प्रतिनिधी

चिखली तालुक्यातील भोकर येथील ऋणानुबंध समाज विकास संस्था, व तुकाराम आश्रय वृद्धाश्रम, सुलोचना माहेर घर भोकरच्यावतीने चिखली येथील गजानन नगर स्थित बुध्द विहार परिसरात ३१ मे रोजी राज्य शासनाच्या कन्यादान योजने अंतर्गत सर्वजातीय सामूहिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यात विवाहबद्ध होणाऱ्या जोडप्यातील वधू पित्याला शासनाकडून पंचवीस हजार रुपये आर्थिक मदत मिळणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३० एप्रिल २०२४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात आवश्यक कागदपत्रे जमा करावे.

त्यामध्ये अर्जदाराचा विहीत नमूण्यातील अर्ज, बाल विवाह प्रतिबंधक कायदा व हुंडा प्रतिबंधक कायद्याचा भंग न केल्याबाबत वर/वधू यांनी लिहुन द्यावयाचे विहीत नमूण्यात प्रतिज्ञापत्र, जन्मतारखेचा पुरावा म्हणून जन्म नोंदणी प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत,महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचा पुरावा,लाभार्थ्याचे पालक हे शेतकरी असल्याचा पुरावा म्हणून संबंधीत शेतकऱ्याच्या जमीनीचा ७/१२ चा उतारा व त्या गावाचे रहीवासी असल्यास ग्रामसेवक / तलाठी यांचा रहिवासी दाखला, लाभार्थ्याचे पालक हे शेतमजूर असल्याबाबत संबंधीत गावातील तलाठी / ग्रामसेवक यांचे प्रमाणपत्र व त्या गावाचे रहीवासी असल्यास ग्रामसेवक / तलाठी



यांचा रहिवासी दाखला, वधु वराचे आधार कार्ड,पालकाच्या बँक पासबुकची झेरॉक्स, अविवाहीत प्रमाणपत्र,(वधु व वर) उत्पन्नाचे प्रमाणपत्र, (वधुच्या वडीलांचे / आईचे) विवाह नोंदणी प्रमाणपत्र, आधार कार्ड वधुच्या आई वडिलांचे, कन्यादान योजनेअंतर्गत सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या जोडप्यांनी सदर योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन ऋणानुबंध समाज विकास संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## गुरुदेव आश्रमात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

चिखली / प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री गुरुदेव आश्रम पळसखेड सपकाळ येथे ३ एप्रिल पासून ३२ व्या वर्धापन दिनाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. या सप्ताह समारंभात सात दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन व अखंड हरिनाम सप्ताह व श्रीराम ज्ञान कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताह समारंभात सकाळपासून ते रात्री पर्यंत या ठिकाणी पहाटे ४ते ६ काकड आरती ६ते ७ शांतीपाठ ७ ते १२ संत तुकाराम महाराज गाथा पारायण १२ ते २ भोजन विश्रांती २ ते ५ संगीत व श्रीराम कथा सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ रात्री नऊ ते ११ कीर्तन ३ एप्रिल पासून ४ एप्रिल पासून रोजी रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत कीर्तनाचे कार्यक्रम होणार आहेत.

## भाजपा सरकारच्या विरोधात जिल्हा काँग्रेसचे आंदोलन

बुलढाणा / प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाने इनकम टॅक्सच्या नावाखाली काँग्रेसची आर्थिक कोंडी केली आहे. लोकसभा निवडणूका होत असताना काँग्रेस पक्षाची बॅक खाती गोठवली आहेत आणि आता १८०० कोटी रुपयांचा दंड भरण्याची नोटीस पाठविली आहे. केंद्रातील मोदी सरकारची ही कारवाई काँग्रेस पक्षाला लोकसभा निवडणुकीत आर्थिक संकटात टाकणारी निष्पक्ष व मोकळ्या वातावरणात निवडणुक लढवण्याच्या तत्वाला बाधा पोहचवणारी आहे. या निषेधार्थ जिल्हा काँग्रेस कमेटीच्यावतीने ३१ मार्च रोजी स्थानिक जयस्तंभ चौकात निषेध आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश




काँग्रेस चे उपाध्यक्ष संजय राठोड, जेष्ठ काँग्रेस नेते लक्ष्मणराव घुमरे, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पाटील अवचार, युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस मनोज कायंदे, जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष अनिकेत मापारी, जिल्हा महीला जिल्हाध्यक्ष मंगलाताई पाटील, जिल्हा विद्यार्थी काँग्रेस चे अध्यक्ष शैलेश खेडकर, बुलडाणा विधानसभा निरिक्षक राम डहाके, किसान काँग्रेस चे चित्रांगण खंडारे, दिगंबर मवाळ, बाळाभाउ भोंडे, प्रा. संतोष आंबेकर सर, तुळशीराम नाईक, मिलींद जैस्वाल, समाधान सुपेकर, देवानंद पवार, शेख समद, गजानन काकड,डॉ. पुरूषोत्तम देवकर, दत्ताभाऊ काकस, गजानन मामलकर, सभापती भगवान धांडे, जाकीर कुरेशी, नितीन राठोड, एकनाथ चव्हाण, अमर कुळे, सैय्यद ईरफान भाई, राजू वाघ, निलेश पाउलझगरे, अमिन टेलर, सुरेश सरकटे,सुनिल पनपालिया, भगवान गायकवाड, संजय खाकरे, किरण खिल्लारे, बाळू खाकरे, आकाश लिमसे, दिनेश घोती, उभेश चव्हाण, आदी उपस्थित होते.

## भाजपा लोकसभा संघटक विजयराज शिंदे उतरणार रिंगणात?

### महाविकास आघाडीतच नव्हे, महायुतीतही बंडाळी

बुलढाणा / प्रतिनिधी



जस जसे लोकसभा निवडणुकीचे वातावरण तापू लागलय तस तसे राजकीय भूकंप आणि हादऱ्यांनी मतदार संघ हेलकावू लागला आहे. शिवसेनेचे आ.संजय गायकवाड यांनी विद्यमान खासदार व महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या आधी लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करून राजकीय वातावरण टाईट केले. ते होत नाही तोच महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा. नरेंद्र खेडेकर यांना घरचा आहेर देत माजी आ.हर्षवर्धन सपकाळ यांनी व्टिट करून इतर काही मतदार संघामध्ये होत असलेल्या 'मैत्रीपूर्ण लढत'चा संदर्भ देत बुलढाणा लोकसभा मतदार संघातही तशीच लढत झाल्यास आपण उमेदवारी दाखल करणार असल्याचे अस्पष्ट संकेत दिले.

त्यांचे व्टिट चर्चेत असतानाच भाजपाचे लोकसभा संघटक तथा माजी आ.विजयराज शिंदे हे सुध्दा कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव लोकसभा निवडणूक लढविणार असल्याच्या चर्चांना उत आला आहे.

#### तसे झाल्यास प्रतापरावांची वाढणार डोकेदुखी

*माजी आमदार विजयराज शिंदे यांनी लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करून ते अर्ज मागे न घेता शेवटपर्यंत निवडणूक रिंगणात कायम राहिल्यास महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांची डोकेदुखी वाढणार आहे. २०१९ च्या निवडणुकीपूर्वी विजयराज शिंदे व प्रतापराव जाधव यांच्यात फारसे आलबेल नव्हते. त्यामुळे शिंदेंना शिवसेना सोडावी लागली असा त्यांच्या कार्यकर्त्यांचा आरोप आहे.*

#### मतदार संघावर जबरदस्त पकड


*एक दोनदा नव्हेतर तब्बल तिनवेळा बुलढाणा विधानसभा मतदार संघावर अधिराज्य गाजविणारे विजयराज शिंदे यांची बुलढाणा व मोताळा तालुक्याचा समावेश असलेल्या बुलढाणा मतदार संघावर प्रचंड पकड आहे. उत्कृष्ट संघटन कौशल्य आणि सर्व जातीधर्मातील मतदारांशी असलेले स्नेहपूर्ण संबंधाच्या बळावर त्यांनी बुलढाणा मतदार संघात तिनदा आमदारकी भोगली. तर २०१९ च्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारीवर दोन नंबरची मते घेतली होती.*

## विहिरीवर पोहायला का आले म्हणून मारहाण; दोघांविरुध्द गुन्हा

चिखली / प्रतिनिधी

माझ्या विहिरीवर पोहायला का आले ? असे म्हणून वाद घालीत मारहाण केल्याची घटना तालुक्यातील मंगरुळ नवघरे येथे २५मार्च रोजी घडली. याप्रकरणी दोघां विरूध्द अमडापूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगरुळ नवघरे येथील नितीन आत्माराम वाकडे यांनी २८ मार्च रोजी अमडापूर पोस्टेला तक्रार दिली की, माझा मुलगा सात्विक वाकडे व त्याचे मित्र सोहम वाकडे, श्रेयस आंभोरे, संदेश आंभोरे, अविनाश आंभोरे, ओम आंभोरे, शिवम तांबट, गोविंद वाकडे, अनिकेत नवघरे हे सर्व कोणालाही न सांगता गावातीलच सतीश गुलाबराव आंभोरे यांच्या ब्राम्हणी नावाच्या शेतातील विहिरीवर पोहायला गेले. दरम्यान सतिश आंभोरे तेथे आला व विहिरीत पोहत असलेल्या मुलांना 'माझ्या विहिरीत पोहायला का आले ?' असे म्हणून अविनाश आंभोरे याचे कपडे विहिरीत फेकुन



### मंगरुळ नवघरे येथील घटना

दिले. यावेळी मुले विहिरीबाहेर आले असता सतीश आंभोरे याने त्यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण केली. तसेच अविनाश आंभोरे याचा मोबाईल फेकून देत पुन्हा माझ्या शेतात आल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. तर सादिक खा चांद खा टकारी यांनी काठी आणून देत 'या काठीने मुलांना मारा' असे म्हणून सतीश आंभोरे यांना मदत केली. अशा तक्रारीवरुन पोलिसांनी आरोपी सतीश गुलाबराव आंभोरे व खादिक खा चांद खा टकारी यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सैलानी यात्रेदरम्यान जादुटोणा कायद्याच्या पत्रकांचे वितरण

बुलढाणा / प्रतिनिधी

सैलानी येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुरू असलेल्या सैलानीबाबा यात्रेदरम्यान आखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी जादुटोणा विरोधी कायद्याचे पत्रक वाटून व चमत्काराची प्रात्यक्षिके दाखवून प्रचार केला.

बुलडाणा जिल्ह्यातील सैलानी येथे दरवर्षी मार्च महिन्या सैलानी बाबांची यात्रा भरते. होळी पौर्णिमेच्या दरम्यान हि यात्रा चालू असते,तर होळीच्या दिवशी येथे नारळाची होळी पेटवली जाते. त्यानंतर पाचव्या दिवसांनंतर



सैलानी बाबांचा संदुल असतो. ह्या यात्रेत मनोरूग्णाची संख्या जास्त दिसून येते. येथे मनोरूग्ण बरे होतात असा गैरसमज जनमानसात पहावयास मिळतो.येथे पेटलेल्या होळीमधे मनोरूग्ण तसेच त्यांचे नातेवाईक मनोरूग्णाचे कपडे,चप्पला बुट किंवा कोणतीही वस्तू फेकतात.ज्यामुळे मनोरूग्ण बरे होतात अशी श्रद्धा दिसून येते परंतु या श्रद्धेच्या नावाखाली येथे मनोरूग्णांवर शारीरिक मानसिक आणि भावनिक अत्याचार होतांना दिसून येतात.येथे प्रचंड प्रमाणात महाराष्ट्र शासनाच्या जादुटोणा विरोधी कायद्याची पायमल्ली होतांना दिसते हे सर्व पोलीस प्रशासन, शासकीय, निमशासकीय कर्मचारी पाहत असतात.हि परिस्थिती बदलून जादुटोणा कायद्याचा प्रचारप्रसार प्रसिध्दी होवून हा कायदा जनमानसात पोहचावा व सल्ला मार्गदर्शन व उपचार मिळून त्यांची समाजातील स्थिती सुधारण्यासाठी दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी आखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी जादुटोणा विरोधी कायद्याचे पत्रक वाटून जनजागृती केली.

### शिवसाई कडून रोहिणी गवई हिचा सत्कार

## विद्यार्थ्यांनो संघर्षाची तयारी ठेवा यश मिळतेच : डी.एस.लहाने

बुलढाणा / प्रतिनिधी

माणसाच्या आयुष्यात संकटे येतात परंतु त्या संकटावर मात करून पुढे जाण्याची मानसिकता असली पाहिजे, आपण जेव्हा सातत्याने प्रयत्न करतो तेव्हाच आपण यशस्वी होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनो संघर्षाची तयारी ठेवा यश मिळतेच. रोहिणी गवईची संघर्ष कथा ही विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा गाथा असल्याचे प्रतिपादन प्रा. डि.एस. लहाने यांनी केले.

रोहिणीची जपानच्या कंपनीत उच्च पदावर निवड झाल्याने ती नुकतीच जपानला रवाना झाली. याबद्दल शिवसाई युनिव्हर्सल व परिवाराच्यावतीने तिचा सत्कार



करण्यात आला.यावेळी ते बोलत होते. संकटांचा बाऊ न करता संकटांना भिडले तर निश्चितच मार्ग सापडतो हे कुमारी रोहिणी गवई हिच्या वाटचालीवरून दिसून येते.कोलवड या गावची सामान्य कुटुंबातील ही मुलगी शिक्षणाच्या बळावर आज जपानला पोचली आहे. घरची परिस्थिती अडचणीची परंतु त्यावर मात करून तिने यशाचा मार्ग निवडला. कुमारी रोहिणी हिचे शिक्षण कोलवड व बुलढाणा येथे झाले, धड शिक्षण घेण्याचीही स्थिती नाही.याही परिस्थितीत जपानी भाषा शिकून जागतिक स्तरावर काही करता येईल का याचा प्रयत्न तिने केला. त्यामध्ये तिला बऱ्यापैकी यश आले. जपानी भाषा अवगत असल्याने तिने तेथील वेगवेगळ्या परीक्षा दिल्या. यामध्ये मोठ्या पगाराची नोकरी तिला मिळाले आहे. याबद्दल रोहिणीचे कौतुक केले जात आहे. शिवसाई परिवाराचे प्रा. डी एस लहाने यांनी रोहिणी गवइच्या कार्याची दखल घेत तिचा सन्मान केला. अशा जिद्दीच्या मुली ह्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक असल्याचे प्राध्यापक लहाने म्हणाले. या वेळी संदीप जाधव व इतरांची उपस्थिती होती.

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीची बैठक उत्साहात

बुलढाणा / प्रतिनिधी

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विस्तारित जिल्हा कमिटीची बैठक समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांच्या उपस्थितीत तर समितीचे जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ. संतोष आंबेकर यांच्या अध्यक्षतेत ३० मार्च रोजी उत्साहात पार पडली.

स्थानिक एम एस इ बी कर्मचारी पतसंस्थेच्या सुंदरखेड येथील कार्यालयात आयोजित बैठकीत प्रारंभी संघटनात्मक आढावा घेण्यात आला. जिल्हा कार्याध्यक्ष प्रदीप हिवाळे यांनी आपल्या प्रास्ताविकात जिल्ह्यातील संघटनात्मक कार्याचा अहवाल सादर केला.यावेळी अरविंद शिंगाडे,कॉ पंजाबराव गायकवाड,प्रा.रविंद्र साळवे,ॲड. जयसिंग देशमुख,अनिल दातीर, युवराज कापरे यांनी आपले विचार व्यक्त केले.